। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ६४ वा । शनिवार दिनांक १६ मे, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## जनगणना -२०२७: घर सूचीकरणासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन



धाराशिव,दि.१५ मे (जिमाका) जनगणना -२०२७ अंतर्गत घर सूचीकरण (House Listing) प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार असून, नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

जनगणना प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणकांकडून नागरिकांच्या घर सूचीकरणाची आवश्यक ती नोंद पूर्ण केली जाणार आहे.तसेच काही कारणास्तव नागरिकांना दिनांक १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वतः स्व-गणना (Self Enumeration) करणे शक्य झाले नसल्यास,अशा नागरिकांसाठी दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त प्रगणक घरभेटी देऊन माहिती संकलित करणार आहेत.

यावेळी नागरिकांनी शासनाने निर्धारित केलेल्या जनगणनेशी संबंधित ३३ प्रश्नांची माहिती प्रगणकांना उपलब्ध करून द्यावी लागणार आहे.या माहितीद्वारे संबंधित नागरिकांची नोंद जनगणनेच्या पोर्टलवर करण्यात येणार आहे.

घर सूचीकरण प्रक्रियेत इमारत व घर क्रमांक,घराचे स्थान,कुटुंबातील सदस्यांची संख्या,कुटुंब प्रमुखाचे नाव,लिंग व प्रवर्ग,राहण्याच्या खोल्यांची संख्या,विवाहित जोडप्यांची संख्या,उपलब्ध सुविधा-सुविधा,मालमत्ता,साहित्य आदी विविध बाबींची माहिती विचारली जाणार आहे.या सर्व माहितीच्या आधारे घर सूचीकरणाचे काम डिजिटल स्वरूपात पूर्ण करण्यात येईल.जनगणना -२०२७ संदर्भातील नागरिकांची माहिती पूर्णपणे गोपनीय व सुरक्षित ठेवली जाणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी जनगणना -२०२७ च्या टप्पा क्रमांक १ मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत होणाऱ्या घर सूचीकरण प्रक्रियेसाठी नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती द्यावी आणि राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

धाराशिव जिल्हा घर सूचीकरणाच्या कामकाजात राज्यात अग्रस्थानी राहावा,यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजी जन्मोत्सव सोहळा समिती धाराशिव गरजवंत शाळकरी २५ मुलांना सायकल वाटप



धाराशिव (शेख अंजुम)- शिवशाही प्रतिष्ठान आयोजित मध्यवर्ती छत्रपती संभाजी जन्मोत्सव सोहळा समिती धाराशिव. याच्या वतीने गरजवंत शाळकरी २५ मुलांना सायकल वाटप केले व रक्तदान शिबिर घेण्यात आले असून यावेळी शिवशाही प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष लखन बापू देशमुख मार्गदर्शक अभिजीत (दादा) देशमुख आमदार कैलास दादा पाटील माझी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर , प्रतिष्ठित समाजसेवक उचे सर , नगरसेवक रवी वाघमारे, प्रदीप भैय्या मुंढे, अमित उंबरे, प्रवीण माळी , पृथ्वीराज दंडनाईक, रवी मुंढे, धर्मराज सूर्यवंशी श्वेता ताई दुरुफकर , राकेश सूर्यवंशी पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट चे लशे मुकिम सिधकी विश्वाजीत देशमुख अभिराम पाटील, आदित्य पाटील, सत्यजीत शिंदे,युवा उद्योग मनोज सुरवसे , व्यंकटेश ओमसे, भवानीसिग राजपूत,चंद्रशेन सुरवसे,धनराज देशमुख महेश (काका ) सुरवसे , ओंकार झोरे, अनुराग गाडेकर ,सौरभ ढोबळे, विवेक देशमूख, श्रीराम शिंदे, अतुल ढोकर,अभिजात रोदवे , लाला बनसोडे. लिंबराज डुकरे,काका पेठे, खालील सय्यद, श्रीकांत देशमुख, अमित लाटे , सोनू बेलूरे , दासोपंत देशपांडे, मयुर देशमुख,सूरज देशमुख , बालाजी बामणे, उमाकांत कवटे. आदी उपस्थित होते.

## दोन रुपयांत कांदा विकायचा मग शेतकऱ्याने जगायचे कसे ?

## कांदा उत्पादकांच्या डोळ्यात अश्रू, सरकारचे मात्र दुर्लक्ष!



**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)**-राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी आज अक्षरशः उद्ध्वस्त होण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. एका बाजूला अवकाळी पाऊस, वाढते उत्पादन खर्च, खत-औषधांच्या वाढलेल्या किंमती आणि मजुरीचा ताण; तर दुसऱ्या बाजूला बाजार समित्यांमध्ये कांद्याला मिळणारा कवडीमोल दर या दुहेरी संकटात शेतकरी पूर्णपणे भरडला जात आहे. प्रतिकिलो कांद्याचा उत्पादन खर्च दहा ते बारा रुपये असताना बाजारात दोन ते चार रुपये किलो दराने कांदा विकण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या का करतो ? हा प्रश्न विचारणाऱ्यांनी आधी शेतकऱ्यांच्या घरातील चूल पाहावी, असा संतप्त सवाल आता ग्रामीण भागातून होत आहे.

राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर कोसळल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. काही ठिकाणी तर कांद्याला एक रुपया किलो दर मिळाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. शेतकरी ट्रॅक्टर, टेम्पो भरून माल बाजारात घेऊन जातो; पण वाहतूक खर्चही निघत नसल्याने अनेकांनी कांदा रस्त्यावर टाकून दिला. काहींनी जनावरांना खाऊ घातला तर काहींनी शेतातच कांदा सडू दिला. कारण बाजारात विकूनही हातात काहीच राहत नसल्याची भीषण अवस्था निर्माण झाली आहे.

कांद्याच्या शेतीसाठी लागणारे बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, ठिबक सिंचन, वीजबिल, पाण्याचा खर्च, मजुरी आणि साठवणूक यावर शेतकरी लाखो रुपये खर्च करतो. अनेकांनी बँकांचे कर्ज घेतले, काहींनी खासगी सावकारांकडून व्याजाने पैसे उचलले; पण माल विकायला गेल्यावर दोन-तीन रुपये किलो भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या हातात अक्षरशः निराशाच उरली आहे.

ग्रामीण भागात अनेक शेतकरी आता उघडपणे बोलू लागले आहेत की, कष्ट आम्ही करायचे, घाम आम्ही गाळायचा, कर्ज आम्ही फेडायचं आणि शेवटी नफा व्यापाऱ्यांनी कमवायचा मग शेतकऱ्याने जगायचं कसं ?

कांद्याचे दर कोसळण्यामागे सरकारचे चुकीचे धोरण हे मोठे कारण असल्याचे जाणकार सांगत आहेत. केंद्र सरकारकडून वेळोवेळी निर्यातबंदी लावली जाते, कधी निर्यात शुल्क वाढवले जाते, तर कधी अचानक निर्णय घेतले जातात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय कांद्याची मागणी घटते. दुसरीकडे व्यापारी आणि दलाल बाजार समित्यांमध्ये दर नियंत्रित करत असल्याचा आरोपही वारंवार होत आहे.

विशेष म्हणजे ग्राहकांना शहरात २० ते ३० रुपये किलो कांदा विकला जातो; मात्र त्याच कांद्याला शेतकऱ्याला दोन ते चार रुपये दर मिळतो. मधला पैसा नेमका कोणाच्या खिशात जातो ? हा प्रश्न आता सामान्य नागरिकही विचारू लागले आहेत.

शेतकरी संघटनांनी सरकारकडे अनेक मागण्या केल्या आहेत. कांद्याला हमीभाव जाहीर करावा, सरकारी खरेदी केंद्र सुरू करावीत, साठवणूक व्यवस्था मजबूत करावी, निर्यात धोरण स्थिर ठेवावे आणि शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. मात्र घोषणांपलीकडे प्रत्यक्ष मदत होत नसल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

आज परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, अनेक शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक संकटामुळे मुलांचे शिक्षण थांबले आहे, बँकांच्या नोटिसा येत आहेत आणि कुटुंबांमध्ये तणाव वाढत आहे. शेतकरी आत्महत्यांच्या घटनांमागे फक्त वैयक्तिक कारण नसून, अशा आर्थिक घुसमटीचाही मोठा वाटा असल्याचे वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही.

**ज्याचं दुःख त्यालाच कळतं,**

ही म्हण आज कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आयुष्याला लागू पडताना दिसत आहे. सरकारने आता केवळ बैठका आणि घोषणा न करता शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर भविष्यात परिस्थिती आणखी भीषण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## क्राईम न्युज

### सत्तर हजाराची आर्थिंग केबलची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०८.०५.२०२६ रोजी ढोकी येथे सर्वे नं ६२ मधील जमीनीवर ७ एमव्ही सोलार प्रोजेक्ट येथील १२ इनव्हर्टरचे ५० स्के एमएम सीयु अर्थींग केबल अंदाजे २४५ फुट एकुण ७०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. व डीसी केबल रेड व डीसी केबल ब्लॅक वायर तोडून कट करुन नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- ज्ञानेश्वर मोहन केंचे, वय ३५ वर्षे, रा. ढोकी ता. जि. धाराशिव यांनी दि.१४.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३२४(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोबाईल ,पॉवर बॅक, घड्याळ, सोन्याचे व चांदीचे दागिन्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी किरण बबन लोंढे, वय ३२ वर्षे, रा. भानसगाव ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचे पाठीमागील उघड्या दरवाजातुन अज्ञात व्यक्तीने दि.११.०५.२०२६ रोजी आत प्रवेश करुन घरातील मोबाईल फोन,पॉवर बॅक, टायटन घड्याळ, १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, २२ ग्रॅमचे चांदीचे दागिने असा एकुण ६८,०००किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-किरण लोंढे यांनी दि.१४.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रन्सफार्मर मालाची चोरी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२३.०४.२०२६ रोजी रोजी ३३/११ केव्ही उपकेंद्र मुरुम येथील सिटी ११ केव्ही करंट ट्रन्सफार्मर ९ अंदाजे ४५,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-बशीर अहमद इसाक जमादार, वय ५३ वर्षे, व्यावसाय खाजगी नोकरी रा. यशवंत नगर मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.१४.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रॅक्टरची बॅटरी, साखळ्या, स्टार्टर आदिची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- राम ईश्वर सोलगे, वय ६८ वर्षे, रा. एकुरगावाडी ता. उमरगा जि. धाराशिव यांचा ट्रॅक्टरची बॅटरी हायड्रोलीक मांडया सट, रुटर शॉफिट पिटीओ,चॅनल हुक साखळ्या स्टॉर्टर, शीट, एअर क्लिनर असे एकुण ४०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी राम सोलगे यांनी दि.१४.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



धाराशिवे (जिमाका) छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने १४ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालून अभिवादन केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनीही महाराजांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

## पोखरा गावांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा अभिनव उपक्रम

*** १३२ गावांत रोजगार, जलसंधारण आणि युवक सक्षमीकरणावर भर * आदर्श गाव निर्मितीचा संकल्प**

धाराशिव जिल्ह्यात पोखरा योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या १३२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे.या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ पोखरा योजनेपुरते मर्यादित न राहता जलसंधारण,रोजगारनिर्मिती,युवक सक्षमीकरण आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात येणार असून आदर्श गाव निर्मितीचा संकल्प करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक गावात किमान १० तरुण उद्योजक घडविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.ग्रामीण युवकांना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यात येणार आहे.दाल मिल,हळद व मिरची पावडर निर्मिती,ठिबक सिंचन योजना,मत्स्य व्यवसाय,शेततळे,फळबाग योजना तसेच विहीर पुनर्भरण यांसारख्या विविध योजनांसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यासाठी या उपक्रमात 'एक खिडकी योजना' प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. कृषी विभागामार्फत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले जाणार असून महिला व बालकल्याण तसेच समाजकल्याण विभागाच्या योजनांची व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

या मोहिमेत विविध सेवाभावी संस्थांचा सहभाग राहणार असून, विशेषतः 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग असणार आहे.ग्रामस्थांना जीवनकौशल्य,सकारात्मक विचार आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे. गावातील स्वच्छता व हागणदारीमुक्ती साध्य करण्यासाठी ग्रामपंचायतींची भूमिका महत्त्वाची राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक गावासाठी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जाणार असून तलाठी,ग्रामसेवक,उमेद अभियानातील कर्मचारी तसेच स्थानिक यंत्रणांना सक्रिय सहभाग घ्यावा लागणार आहे.

नियुक्त अधिकारी प्रत्येक १५ दिवसांत किमान एक दिवस संबंधित गावात मुक्कामी राहून ग्रामस्थांशी संवाद साधतील आणि विविध समस्यांचे निराकरण करतील.पुढील दोन वर्षांत हा उपक्रम प्रभावीपणे राबवून ग्रामीण भागात विकासाची नवी चळवळ उभी करण्याचा संकल्प जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केला आहे.

## डेंग्यूमुक्त धाराशिवसाठी लोकसहभागाची गरज

## जागतिक डेंग्यू दिनानिमित्त आरोग्य विभागाचे आवाहन

धाराशिव दि.१४ मे (जिमाका) दरवर्षी १६ जून रोजी 'जागतिक डेंग्यू दिन' साजरा केला जातो.यंदा डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे.साचलेल्या पाण्याची तपासणी करा,स्वच्छता राखा आणि ती भांडी झाकून ठेवा.ही संकल्पना घेऊन जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय वेक्टर जन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

डेंग्यू हा एडिस इजिप्ती डासाच्या मादीमुळे पसरणारा गंभीर आजार असून,वेळेत निदान व उपचार न झाल्यास तो जीवघेणा ठरू शकतो. धाराशिव जिल्ह्यात डेंग्यू नियंत्रणासाठी आरोग्य विभाग व जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत विविध प्रतिबंधात्मक उपक्रम राबविले जात आहेत.

डेंग्यूची प्रमुख लक्षणे म्हणजे उच्च ताप,तीव्र डोकेदुखी,डोळ्यांच्या मागे वेदना,अंगदुखी व सांधेदुखी,त्वचेवर पुरळ तसेच उलटी होणे ही आहेत. अशी लक्षणे आढळल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या आरोग्य संस्थेत जाऊन रक्त तपासणी करून उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

डेंग्यू प्रतिबंधासाठी आरोग्य विभागाने काही महत्त्वाच्या उपाययोजना सुचविल्या आहेत.



आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळून घरातील पाण्याची भांडी,रांजण व टाक्या रिकाम्या करून स्वच्छ घासून कोरड्या ठेवाव्यात.पाण्याचे सर्व साठे घट्ट झाकणांनी झाकून ठेवावेत. घराभोवती साचणारे पाणी,खड्डे,जुने टायर,नारळाच्या करवंट्या,फुटकी भांडी यांची योग्य विल्हेवाट लावून परिसर स्वच्छ ठेवावा.हौद,डबकी किंवा साचलेल्या पाण्यात डासांच्या अळ्या नष्ट करण्यासाठी गप्पी मासे सोडण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.यासाठी नागरिकांनी जवळच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा. तसेच डासांपासून संरक्षणासाठी मच्छरदाणीचा वापर करावा आणि पूर्ण अंग झाकले जाईल असे कपडे परिधान करावेत.

डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग हाच एकमेव प्रभावी मार्ग आहे. स्वच्छता राखून आणि पाण्याची योग्य साठवण करून आपण सर्वांनी मिळून धाराशिव जिल्हा डेंग्यूमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा.असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## इंधनदरात वाढ म्हणजे, महागाईत वाढ

सरळ आणि सोपे गणित सर्वांना माहिती आहे. ज्यावेळी इंधनाच्या दरात वाढ होती त्या-त्या वेळी निश्चित सर्व वस्तूच्या दरात वाढ होते. त्यामुळे महागाई वाढल्याची रास्त ओरड होते. प्रत्येक वस्तू ही स्थलांतरीत होत असते. वाहातुक होते. वाहातुकीचे दर वाढण्याचे कारण इंधन महागल्याने प्रत्येक वस्तूच्या दरात आपोआप वाढ होते. त्यामुळे जनता महागाई वाढली अशी ओरड करतात. याला पर्याय नाही. इंधनाच्या दरात जेवढी वाढ त्याच्या दुप्पट दरात वाढ हे गणितच आहे. या बाबत संशोधकांची गरज नाही. नुकत्याच देशात पाच राज्याच्या निवडणुका पार पडल्या. तीन ठिकाणी सत्ताधाऱ्यास यश मिळविता आले. त्यानंतर इंधनाच्या दरात वाढ निश्चित भाकीत व्यक्त करीत होतेच. त्यात ईस्त्राईल-इराणचे युद्ध समाप्त होत नाही व हॉर्मुझामधून तेलाचे जहाज आणता येत नाही तो पर्यंत इंधन संकट राहाणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचा आडमुठ धोरणाचा हा परिणाम भोगावा लागत आहे. इंधनाचे दर वाढणार हे जनतेला सुद्धा कळाले होते मात्र ते कधी वाढणार हे निश्चित नव्हते. वास्तविक इंधनाचे दरात मोठी वाढ झाली नसली तरी बाजारात मध्ये महागाई मोठ्या प्रमाणात वाढणार, कारण यावर कोणाचे म्हणावे तसे नियंत्रण दिसून येत नाही. पेट्रोल आणि डिझेल प्रति लिटर ३-३ रुपयांनी महाग झाले आहे. दिल्लीत आता पेट्रोल ९७.७७ रुपये प्रति लिटरने मिळेल. डिझेलची किंमत ९०.६७ रुपये प्रति लिटर झाली आहे. नवीन दर १५ मे पासून लागू झाले आहेत. सुमारे २ वर्षांनंतर दरांमध्ये ही वाढ करण्यात आली आहे. या वाढीचे मुख्य कारण आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आहे. इराण आणि अमेरिकेतील युद्ध सुरू होण्यापूर्वी क्रूड ऑइलचे दर ७० डॉलर होते, जे आता वाढून १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत. युद्धाचा परिणाम आहे. युनो सारखी जागतिक स्तरावरील संघटनशक्ती गप्प आहे. जग आता असुरक्षित वाटायला लागले आहे. क्रूडच्या किमती वाढल्याने तेल कंपन्या दबावाखाली होत्या. त्यामुळे कंपन्यांनी तोट्याची भरपाई करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. जर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये दीर्घकाळ वाढ कायम राहिली, तर पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी वाढवल्या जाऊ शकतात. यामुळे काही दिवसापुर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना काटसरीने वागण्याचा सल्ला दिला होता. त्याच वेळी आता इंधनाच्या दरात वाढ होणार असे कळाले होते. दर कधी वाढतील हे सांगता येत नसले तरी निवडणुकांनतर वाढतील असे कळून येत होते. तेच झाले. जागतिक स्तरावरील किंमतीवर इंधनाचे दर ठरत असतात. तोट्यात तेलकंपन्या व्यवसाय करू शकत नव्हत्या, त्यानंतर अल्पदरवाढ झाली आहे. ही अल्प वाटत असली तरी बाजारातील सर्वच वाढणाऱ्या किंमतीचा फटका जनसामान्य नागरिकांना सोसावा लागणार आहे. इंधनाचे दर वाढले असे जाहिर होताच व्यापारी मंडळींनी किंमान सहा टक्के दरात वाढ करतील असे दिसून येते. वास्तविक इंधनाचे दर आणखिन वाढतील कारण युद्ध समाप्त झाले नाही. त्यामुळे स्वतः मुख्यमंत्री फडणवीस हे मोटारसायकलवरून विधान भवनात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ईलेक्ट्रिक कार वापरायाला सुरवात केली आहे. अनेक मंत्री, आमदारांनी आता आपला गाड्यांचा ताफा कमी केला आहे. मुळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काटकसर करावी असे सुचित केले त्यावेळी टिका केली. मुळात पंतप्रधानाच्या आवाहनास साथ देणे उचित आहे. इंधनाची दर वाढ झाली त्यामुळे महागाई झेलण्यात तयार असले पाहिजे. महागाई वाढतीच आहे ती कमी झाले असे होत नाही. कमी होण्यासाठी सरकारी यंत्रणा मजबुत असली पाहिजे. अगोदरच महागाईत जनता आडकली आहे. पुन्हा इंधनाच्या दरवाढीने शक्यता आहे. वास्तविक दरवाढ होती नसली तरी बाजारात मोठ्या प्रमाणात महागाई वाढते ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे किती प्रमाणात इंधनाचे दर वाढले त्याचे प्रमाणात महागाईत वाढ होणे अपेक्षित आहे मात्र यावर कोणाचे लक्ष नसते? असो, एकदाचे इंधनाचे दर वाढले आहेत. आता समजा युद्ध संपल्यावर इंधनाचे दर कमी होतील का? असे यापुर्वी कधी झाले नाही व यापुढेही होणार नाही. दहा-वीस वर्षापुर्वी गॅस व पेट्रोल, डिझेलचे दर काय होते व आता काय आहेत. पुर्वी जीवनाश्यक वस्तूचे दर काय होते व आता काय आहेत याचा तुलनात्मक विचार करावा. अनेक बाबीचे उत्तर आपोआप कळून येतील. महागाई वाढत राहाणार ती सहन करण्याची सहनशीलता नागरिकात असली पाहिजे. मुळात इंधनाचे दराचा फटका मोठा आहे. ट्रान्सपोर्टींग आले की, बाजारात डोळे झाकून महागाई वाढली जातेच असे ग्रहीत धरलेच पाहिजे. यावर मात करण्यासाठी एक तर काटकसरीने वागले पाहिजे. दुसरे वस्तूची वाटोळे होता कामा नये. पाहिजे तेवढे, आवश्यकच खरेदी व प्रवास करण्याची सवय लावुन घेतली पाहिजे कारण नसताना जर प्रवास व इंधनाचा वापर वाया घालणार असाल तर जगणे कठिण होणार आहे. त्यामुळे आता पुर्वी सारखे वागता येणार नाही. पुर्वी सारखे अनेक गाड्या वापरता येणार नाही. या इंधनाच्या वाढलेल्या दरामुळे पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या गाड्याची खरेदी कमी होणार, उद्योगपती उत्पादन कमी करणार, त्यामुळे कामागार बेकार होण्याची भिती निर्माण होणार तर बाजारात बेकारी वाढणार! असे भयाण चित्र इंधनाच्या दरवाढीमुळे होण्याची चिन्हे दिसून येणार आहेत. त्यामुळे वेळीच नागरिकांनी विचार करून वागण्यात सुरवात केली पाहिजे. याला पर्याय एकच आहे ती म्हणजे काटकसरीने वागणे. अनाश्यक बाबीला तिलांजली देणे. नसता जीवन जगणे कठिण होवू शकते. इंधनाचे दर वाढले आहेत. युद्ध समाप्त झाले तरी स्वस्त इंधन होईल याची गॅरंटी नाही. उलट इराण हा अधिक दर वाढ करून पुन्हा उभारणीसाठी अधिकचा मोबदला खर्च करेल. त्यामुळे आता भारतातील नागरिकांनी वाढीव महागाईतून कसा मार्ग काढायाचा हे ठरविले पाहिजे. मार्ग तर काढलाच पाहिजे. जगण्यासाठी संघर्ष अटळ असून परिस्थिती समजून घेवून मार्ग शोधणे हा एकमेव संकटकालीन मार्ग आहे.

# मेजर इन इंग्लिश: करिअर, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाची त्रिसूत्री

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिक्षण, व्यवसाय, तंत्रज्ञान, संवाद आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगती साधण्यासाठी इंग्रजी ही एक प्रभावी किल्ली ठरते. अशा परिस्थितीत बी.ए. पदवीमध्ये इंग्रजी हा मुख्य विषय (Major in English) निवडणे विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या दृष्टीने अत्यंत लाभदायक ठरत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP-2020) ने शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडवून आणले आहेत. या धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. फक्त पाठांतरावर आधारित शिक्षण न देता, विचारशक्ती, सर्जनशीलता, संवाद कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास यांना प्राधान्य दिले जाते. इंग्रजी विषयाच्या अभ्यासातून ही सर्व कौशल्ये प्रभावीपणे विकसित होतात.

बी.ए.मधील इंग्रजी मुख्य विषयातून करिअर घडविण्याचे महत्त्व- NEP-2020च्या पार्श्वभूमीवर सर्वांगीण विकासाचा मार्ग:

इंग्रजी विषय घेतल्यामुळे विद्यार्थ्यांची वाचन, लेखन, बोलणे आणि समजून घेण्याची क्षमता अधिक सक्षम होते. साहित्य, कविता, कादंबरी, नाटके यांचा अभ्यास केल्याने विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, संवेदनशीलता आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोन विकसित होतो. यामुळे विद्यार्थी केवळ परीक्षेत यशस्वी होत नाहीत, तर जीवनातील विविध क्षेत्रांमध्येही सक्षम बनतात.

**इंग्रजी विषयातून करिअरची नवी दिशा: ज्ञानासोबत कौशल्यांची भरारी:**

NEP-2020 च्या अंतर्गत मल्टिडिसिप्लिनरी शिक्षणावर भर दिला गेला आहे. इंग्रजीसोबत इतर विषयांचा अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. त्यामुळे ते विविध क्षेत्रांमध्ये आपली आवड आणि कौशल्ये विकसित करू शकतात. तसेच, कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध होतात.

यामध्ये विविध अभ्यासक्रमांचे विशेष महत्त्व अधोरेखित होते. Ability Enhancement Course (AEC) in English विद्यार्थ्यांच्या मूलभूत भाषिक कौशल्यांना धार लावतो-जसे की प्रभावी लेखन, संवाद कौशल्ये आणि समज क्षमता. Generic Elective - English for Competitive Exams हा अभ्यासक्रम स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेली भाषिक तयारी, वाचनगती आणि विश्लेषण कौशल्य विकसित करतो, ज्यामुळे UPSC, MPSC, Banking, SSC यांसारख्या परीक्षांमध्ये यश मिळविण्यास मदत होते.

बी.ए. मध्ये इंग्रजी हा प्रमुख विषय घेतल्यास केवळ साहित्य आणि व्याकरणापुरते मर्यादित न राहता, विविध क्षेत्रांत यशस्वी करिअरच्या संधी उपलब्ध होतात.

बी.ए. इंग्रजी' या पारंपरिक पदवीकडे आजवर वेळूक, किंवा व्यवसायाच्या दृष्टीने 'मर्यादित' असे पाहिले जात होते; मात्र आता हा दृष्टिकोन बदलत आहे. तज्ज्ञांच्या मते, ही पदवी योग्य नियोजन केल्यास करिअरची व्यापक क्षितिजे उपलब्ध करून देते.

केरळच्या अनेक विद्यापीठांप्रमाणे राज्यातील विद्यार्थ्यांनीही आता इंग्रजी विषयाला अभ्यासपूर्ण आणि व्यावसायिक अशा दोन्ही दृष्टिकोनातून पाहायला हवे, असे तज्ज्ञांचे मत आहे. भाषा, सर्जनशीलता आणि विश्लेषणात्मक कौशल्यांची जोड असलेले विद्यार्थी या क्षेत्रात चमकू शकतात.

**भाषा आणि संप्रेषण कौशल्यात प्रभुत्व:**

इंग्रजी विषयाचा अभ्यास वाचन, लेखन, बोलणे आणि समजून घेण्याची क्षमता वाढवतो. चांगले संप्रेषण कौशल्ये ही कोणत्याही क्षेत्रात (मीडिया, शिक्षण, कॉर्पोरेट) अत्यंत मोलाची असतात

**इंग्रजी विषय – स्पर्धा परीक्षा ते कॉर्पोरेट जगत: यशाची गुरुकिल्ली:–**

इंग्रजी विषयात करिअर करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्किल्स, कॉर्पोरेट विश्वात यशस्वी वाटचाल करण्यासाठी एपसश्रळीह षी उरीशशी हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना व्यावसायिक जगासाठी तयार करतो. यात रिझ्युमे लेखन, मुलाखत कौशल्ये, व्यावसायिक संवाद यांचा समावेश असतो. Vocational Skill Enhancement Course (VSEC) in English - Translation and Interpreting विद्यार्थ्यांना भाषांतर आणि दुभाषेगिरी यांसारख्या कौशल्यांमध्ये प्रशिक्षित करतो, ज्यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात.

याशिवाय, Soft Skills चा अभ्यास विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात मोलाचा वाटा उचलतो. टीमवर्क, नेतृत्वगुण, समस्या सोडविण्याची क्षमता, वेळ व्यवस्थापन आणि प्रभावी संवाद यांसारख्या कौशल्यांमुळे विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे तर व्यावसायिकदृष्ट्याही सक्षम बनतात.

इंग्रजी मुख्य विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या अनेक दिशा खुल्या होतात. अध्यापन, पत्रकारिता, अनुवादक, कंटेंट रायटिंग, पब्लिशिंग, सार्वजनिक संबंध (PR), तसेच कॉर्पोरेट क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. डिजिटल युगात ब्लॉगिंग, फ्रीलान्स लेखन, आणि सोशल मीडिया व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांमध्येही इंग्रजीचे महत्त्व वाढले आहे.

इंग्रजी विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवितो. Literary General Knowledge Quiz Contest द्वारे विद्यार्थ्यांचे साहित्यिक ज्ञान वाढवले जाते. Open Book Test विद्यार्थ्यांना समजून घेण्याची आणि विश्लेषण करण्याची सवय लावतो. इेज्ञ Review Activity विद्यार्थ्यांच्या वाचन आणि अभिव्यक्ती कौशल्यांना चालना देते.

तसेच, Poster and Slogan Making Competition विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देते. इश्रशपवशव ड्शरीपळपस पद्धतीमुळे ऑनलाइन आणि ऑफलाइन शिक्षणाचा समतोल साधला जातो. Mentor-Mentee Program विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन आणि भावनिक आधार प्रदान करतो, तर उेपषळवशपलश ईीळश्रवळपस Sessions विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना व्यावसायिक जीवनासाठी सक्षम बनवतात.

याशिवाय, इंग्रजी विभागातील Multilingual Library हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. या ग्रंथालयामध्ये विविध भाषांतील पुस्तके उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांना बहुभाषिक ज्ञान मिळते. यामुळे त्यांची वाचनाची आवड वाढते, विविध संस्कृतींची ओळख होते आणि भाषिक समृद्धी साध्य होते. NEP-2020 च्या बहुभाषिकतेच्या तत्त्वांनुसार ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना देते.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील इंग्रजी विभागाने विद्यार्थ्यांसाठी बहुभाषिक ग्रंथालय उपलब्ध करून दिले आहे. हे ग्रंथालय केवळ पुस्तकांचा संग्रह नसून विद्यार्थ्यांच्या ज्ञान, संस्कृती आणि कौशल्य विकासाचे केंद्र आहे.

**बहुभाषिकतेचे फायदे आणि शैक्षणिक महत्त्व:–**

इंग्रजी, मराठी, हिंदी यांसारख्या भाषांतील साहित्यामुळे विद्यार्थ्यांना विविध संस्कृतींचा परिचय होतो. जागतिक साहित्य व स्थानिक साहित्य यांचा संगम विद्यार्थ्यांना सर्वांगीण दृष्टिकोन देतो. बहुभाषिक वाचनामुळे संवादकौशल्य, भाषांतर क्षमता आणि सर्जनशीलता वाढते.

NEP 2020 च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बहुभाषिक ग्रंथालय विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण देते. संशोधन, प्रकल्प व स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक संदर्भ साहित्य येथे उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील साहित्य वाचण्याची संधी मिळते.

याशिवाय, इंग्रजी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे मांडू शकतात, विविध संस्कृतींना समजून घेऊ शकतात आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम होतात.

शेवटी, बी.ए. इंग्रजी म्हणजे कुशलतेने वापरल्यास एक मौल्यवान करिअर 'लाँचपॅड' आहे. विद्यार्थ्यांनी याकडे केवळ कंटाळवाण्या साहित्याचा अभ्यास म्हणून न पाहता, ते भाषेच्या क्षमतेचे धारदार शस्त्र म्हणून वापरायला हवे. एकूणच, बी.ए. मध्ये इंग्रजी मुख्य विषय घेणे म्हणजे केवळ पदवी मिळवणे नव्हे, तर एक उज्वल आणि व्यापक करिअर घडविण्याचा मार्ग आहे. NEP-2020 च्या संकल्पनांनुसार हे शिक्षण विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देत नाही, तर त्यांचा सर्वांगीण विकास साधून त्यांना एक सक्षम, सर्जनशील आणि जागतिक नागरिक बनवते.



**प्रा.रमेश तडवी**
इंग्रजी विभागप्रमुख
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर.
८६०००७७८३६

## सोमनाथ 'स्वाभिमान पर्व': श्रद्धेच्या विजयाची आणि भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाची १००० वर्षे



भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर, जिथे अथांग अरबी समुद्र भगवान शिवाच्या चरणांचे प्रक्षालन करतो, तिथे उभे असलेले प्रभास पाटनचे सोमनाथ मंदिर केवळ एक वास्तू नाही, तर ते भारताच्या अजेय आत्मसन्मानाचे जिवंत प्रतीक आहे. शिवपुराणात उल्लेखिलेल्या द्वादश ज्योतिर्लिंगांमधील प्रथम स्थान म्हणून सोमनाथाचे महत्व अनन्यसाधारण आहे. परंतु, आज जेव्हा आपण २०२६ या वर्षात पदार्पण केले आहे, तेव्हा हे मंदिर एका ऐतिहासिक कालखंडाचे साक्षीदार म्हणून आपल्यासमोर उभे आहे.

हे वर्ष भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. या वर्षाचे महत्व दोन प्रमुख कारणांसाठी आहे. जानेवारी १०२६ मध्ये आक्रमक महमूद गजनीने सोमनाथ मंदिरावर पहिले भीषण आक्रमण केले होते. या घटनेला या वर्षात १००० वर्षे पूर्ण होत आहेत. हे पर्व त्या सर्व वीर आत्मबलिदानांचे स्मरण करण्याचे निमित्त आहे, ज्यांनी या मंदिराच्या रक्षणासाठी आणि अस्मितेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. तसेच मे १९५१ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते नूतन सोमनाथ मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली होती. या ऐतिहासिक घटनेला २०२६ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजेच, हे वर्ष सोमनाथ मंदिराच्या 'अमृत महोत्सवा'चेही आहे.

शतकानुशतके परकीय आक्रमकांनी या मंदिराला लुटले, त्याची मोडतोड केली. त्यांचा उद्देश केवळ संपत्ती लुटणे हा नव्हता, तर भारताचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कणा मोडणे हा होता. परंतु, प्रत्येक आक्रमणाने भक्तांची श्रद्धा अधिकच दृढ झाली. जितक्या वेळा हे मंदिर पाडले गेले, तितक्याच जोमाने भारतीयांनी पुन्हा त्याची उभारणी केली.

स्वातंत्र्यानंतर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथच्या पुनर्बांधणीचा जो संकल्प सोडला, तो केवळ एका मंदिराचा जीर्णोद्धार नव्हता, तर तो गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होणाऱ्या भारताचा उद्घोष होता. सरदार पटेलांचा हाच वारसा पुढे नेण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

सोमनाथ हे केवळ शिवाचे धाम नाही, तर ते भगवान श्रीकृष्ण आणि शक्तीच्या उपासनेचेही पावन स्थान आहे. हे मंदिर प्राचीन काळापासून भारताचे आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र राहिले आहे. येथील 'स्वाभिमान पर्वा'चा उद्देश आपल्या गौरवशाली वारशाची ओळख नव्या पिढीला करून देणे हा आहे. 'स्वाभिमान पर्व' हे केवळ उत्सवाचे साधन नसून, ते आपल्या सामूहिक संकल्पाचे प्रतीक आहे.

सोमनाथ मंदिराची कथा ही विजयाची कथा आहे. अन्यायावर न्यायाच्या, विनाशावर सृजनाच्या आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाची. १०२६ मधील त्या काळरात्रीपासून सुरू झालेला हा प्रवास आज २०२६ मध्ये एका वैभवशाली भारताच्या उदयापर्यंत येऊन पोहोचला आहे. सोमनाथचा हा जिर्णोद्धार जगाला सांगतो की, भारत आता केवळ स्वतंत्र झालेला देश नाही, तर तो आपली प्राचीन ओळख आणि वैभव पुन्हा प्राप्त करणारा 'विश्वगुरु' बनण्याच्या मार्गावर असलेले राष्ट्र आहे.

या 'स्वाभिमान पर्वा'च्या निमित्ताने आपण सर्वजण या पवित्र भूमीला नमन करूया आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी व संस्कृतीच्या रक्षणासाठी कटिबद्ध होऊया.



**– ॲड. आकाश फुंडकर,**
**कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य.**

# दुष्काळाच्या छायेत आशेचा झरा 'जलतारा'मुळे धाराशिवमध्ये उगवतेय नवजीवनाची पहाट

धाराशिवच्या मातीत दुष्काळ नवा नाहीउन्हाळ्याची चाहूल लागली की गावागावातील विहिरींचा तळ दिसू लागतो, बोअरवेल कोरड्या पडतात,टँकरच्या पाण्यासाठी रांगा लागतात आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पुन्हा एकदा चिंतेचे ढग दाटू लागतात.आकाशात ढग दाटले तरी पाऊस हमखास पडेल याची शाश्वती उरलेली नाही.बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान आणि वर्षानुवर्षे घटत चाललेली भूजल पातळी यामुळे धाराशिवसारख्या दुष्काळी जिल्ह्यासमोर जलसंकट दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे.

अशा परिस्थितीत जलतारा अभियान हे केवळ प्रशासनाचे अभियान न राहता आशेचा नवा किरण ठरत आहे.कारण ही मोहीम फक्त पाणी अडविण्याची नाही,तर भविष्य वाचविण्याची आहे पुढील पिढ्यांच्या अस्तित्वासाठी उभा राहिलेला सामूहिक संकल्प आहे. पाणी म्हणजे केवळ तहान भागविणारे साधन नाही; ते शेतीचे जीवन,जनावरांचा आधार,ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आणि पर्यावरणाचा श्वास आहे.म्हणूनच आज पाणी अडवा,पाणी जिरवा ही संकल्पना घोषणांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची वेळ आली आहे. जलतारा अभियानातून धाराशिव जिल्ह्यात हीच जाणीव लोकांच्या मनामनात रुजताना दिसत आहे.

गावोगावी तलाव,नाले,ओढे,विहिरी आणि शेततळ्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी लोकसहभागातून मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत.गाळ काढणे,नाले खोलीकरण,बंधारे उभारणे,वृक्षारोपण, जलस्रोत स्वच्छता आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपक्रमांमुळे अनेक गावांमध्ये सकारात्मक बदल जाणवू लागले आहेत. ज्या विहिरी काही वर्षांपूर्वी एप्रिलमध्येच कोरड्या पडत होत्या,त्या आता अधिक काळ पाण्याने




भरलेल्या राहू लागल्या आहेत.काही भागांत भूजल पातळी वाढल्याचेही चित्र दिसून येत आहे.

विशेष म्हणजे या अभियानाने दुष्काळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.पूर्वी पाणीटंचाई आली की फक्त शासनाकडे मदतीची अपेक्षा ठेवली जात होती; मात्र आता गावकरी स्वतः पुढाकार घेत जलसंधारणाच्या कामांत उतरू लागले आहेत.युवकांचे श्रमदान, महिला बचत गटांचा सहभाग, शेतकऱ्यांचे नियोजन आणि सामाजिक संस्थांची साथ यामुळे जलतारा आता लोकचळवळ बनू लागले आहे.

धाराशिवसारख्या जिल्ह्यासाठी भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे.कारण येथील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा आधार भूजलावरच आहे.पावसाचे पाणी जमिनीत मुरले तरच विहिरी आणि बोअरवेल जिवंत राहू शकतात.त्यामुळे पडणारा प्रत्येक थेंब अडविणे आणि जिरविणे ही आता निवड नसून अपरिहार्यता बनली आहे.

या मोहिमेला अधिक बळ मिळत आहे ते प्रशासन,लोकसहभाग आणि सेवाभावी संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी एक लाख जलतारा तयार करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प जिल्ह्यासमोर ठेवला आहे. प्रत्येक शेतकरी उत्पादक कंपनी आणि शेतकरी गटाला प्रत्येकी ५०० जलधारा कामांचे उद्दिष्ट देण्यात आले असून,गावागावात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या अभियानात नाम फाउंडेशनसह विविध सामाजिक संस्था सक्रियपणे सहभागी झाल्या आहेत.नाम फाउंडेशनच्या माध्यमातून जलतारा कामांसाठी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जात आहे.त्यामुळे जलसंधारणाच्या कामांना वेग मिळत असून,भविष्यात जिल्ह्यातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात वाढण्याची आशा निर्माण झाली आहे. त्याचा थेट लाभ शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे.

आजही अनेक शेतकरी अपुऱ्या पाण्यामुळे पिकांचे नुकसान सहन करत आहेत. जनावरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो.अशा वेळी जलसंधारणाची प्रत्येक कृती उद्याच्या संकटावर मात करण्याची ताकद ठेवते.कारण जिथे पाणी टिकते,तिथे शेती टिकते; शेती टिकली की गावाची अर्थव्यवस्था टिकते आणि गाव टिकले की भविष्य सुरक्षित राहते.

थेंब थेंब जपला तरच उद्याचा झरा वाहील,जलसंवर्धनाच्या वाटेवरूनच समृद्धीचा सूर्य उगवेल

जलतारा अभियानाची खरी ताकद म्हणजे त्यातून निर्माण होणारी सामाजिक जाणीव. हे अभियान केवळ जलस्रोत दुरुस्त करण्यापुरते मर्यादित नाही,तर पाण्याबाबत जबाबदारीची संस्कृती निर्माण करत आहे.घरगुती वापरापासून शेतीपर्यंत पाण्याचा योग्य वापर,पुनर्वापर आणि बचत याबाबत समाजात जागरूकता निर्माण होत आहे.

धाराशिवला दुष्काळमुक्त आणि जलसंपन्न बनवायचे असेल,तर जलतारा ही फक्त मोहीम न राहता लोकांच्या मनातील चळवळ बनली पाहिजे. शासन, प्रशासन,सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी हातात हात घालून पुढे आले,तर दुष्काळावर मात करणे अशक्य नाही. कारण आज जपलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करणार आहेआणि कदाचित याच थेंबांतून धाराशिवच्या नव्या समृद्धीची पहाट उगवणार आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

# दररोज फक्त २ खजूर खाण्याची लावा कारण...

मुंबई: आजच्या वेगवान लाईफस्टाईलमध्ये स्वत:ला हेल्दी आणि फिट राखणे खरंच आव्हानात्मक आहे. वेळेच्या अभावामुळे अनेकदा एक्सरसाईज अथवा योगा करता येत नाही. अशातच अनेक लोक विविध पद्धती शोधून काढतात. आरोग्य चांगले राहावे यासाठी डाएटिंगच्याही अनेक पद्धतीही शोधून काढतात.तज्ञ म्हणतात की जर दिवसाची सुरूवात खजूराने केली तर तुम्ही नेहमी फिट राहाल. खजुरामध्ये अँटी ऑक्सिडंट मोठ्या प्रमाणात असतात. यामुळे कॅन्सरसारखे आजार दूर राहतात. हृदयाच्या आरोग्यासाठी खजूर चांगले मानले जाते. याच्या वापराने बद्धकोष्ठता, मेटाबॉलिज्म, वजनासारख्या समस्या येतात. जाणून घ्या खजूर खाण्याची योग्य वेळ आणि याचे फायदे.

खजूर हे असे फळ आहे. यात अँटीऑक्सिडंट मोठ्या प्रमाणात असते. आर्यन, फोलेट, प्रोटीन, फायबर, कॅल्शियम, मॅग्नेशियम, व्हिटामिन बी ६ सारखी पोषकतत्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. यामुळे अनेक प्रकारचे आजार दूर होतात.

खजुरामध्ये फ्रुक्टोज आढळते. जर रिकाम्या पोटी खजूराचे सेवन करता तर पोट खराब होऊ शकते. भरलेल्या पोटाने खजूर खाणेही चांगले नसते. कारण जेवण जेवल्यानंतर पोट भरलेले राहते आणि खजुरामध्ये आढळणारे फायबर पाचन क्रियाची समस्या वाढू शकते. यामुळे सूजेचा त्रास होऊ शकतो.

खजूर तुम्ही ब्रेकफास्टमध्ये अथवा दिवसभर कधीही खाऊ शकता. सकाळी-सकाळी खजूर खाल्ल्याने एनर्जी मिळते. यामुळे आतड्यामधील किडे मरून जाऊ शकतात.सकाळी खजूर खाल्ल्याने शरीराच्या काही भागांची सफाई चांगल्या पद्धतीने होते. हृदय आणि लिव्हरचे आरोग्य सुधारते. खजुरामध्ये आढळले जाणारे अँटीऑक्सिडंट चेहऱ्याची चमक वाढते तसेच केसांचे वयही वाढते. तसेच अनेक फायदेही मिळतात.



# छातीचा आकार आणि स्नायू वाढवण्यासाठी

नियमित व्यायाम, योग्य आहार आणि पुरेशी विश्रांती आवश्यक आहे. वर्कआउटमध्ये पुश-अप्स, बेंच प्रेस आणि डंबेल फ्लाय यांचा समावेश कराआहारात प्रथिनांचे प्रमाण जास्त ठेवा आणि स्नायूंच्या पुनर्प्राप्तीसाठी (ीशलेंीशी) दररोज ७-८ तासांची झोप घ्या.छाती वाढवण्यासाठी अत्यंत प्रभावी आणि सोप्या टिप्स खालीलप्रमाणे आहेत:१. प्रभावी व्यायाम (उहशीीं एुशी-लळीशी)पुश-अप्स (झीीह-ीिी): घरी किंवा जिममध्ये कोणत्याही साहित्याशिवाय छातीचे स्नायू बळकट करण्यासाठी हे सर्वोत्तम आहेत। याचे ३-४ संच (ीशीी) माराबेंच प्रेस (इशपलह झीशीी): छातीचा आकार आणि जाडी वाढवण्यासाठी हा मुख्य व्यायाम आहे। बारबेल किंवा डंबेलच्या मदतीने तुम्ही हा व्यायाम करू शकताइन्क्लाइन आणि डिक्लाइन प्रेस (खपलश्रळपश/ऊशलश्रळपश झीशीी): छातीच्या वरच्या आणि खालच्या भागाच्या विकासासाठी हे व्यायाम उपयुक्त आहेत२. योग्य आहार (ऊळशीं)प्रथिने (झीेंशळपी): स्नायूंच्या वाढीसाठी अंडी, चिकन, मासे, पनीर, सोयाबीन आणि डाळींचा आहारात समावेश कराकार्बोहायड्रेट्स आणि फॅट्स: शरीराला ऊर्जेसाठी ओट्स, सुकामेवा, शेंगदाणे आणि दुग्धजन्य पदार्थांचे सेवन कराभरपूर पाणी: दिवसभर भरपूर पाणी प्या, जेणेकरून स्नायूंना हायड्रेशन मिळेल आणि ताकद टिकून राहील.३. महत्त्वाच्या टिप्सप्रोग्रेसिव्ह ओव्हरलोड (झीेसीशीीळींश जींशीश्ररव): स्नायूंची वाढ होण्यासाठी हळूहळू व्यायामाची तीव्रता आणि वजन वाढवा.योग्य फॉर्म आणि तंत्र: व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने वजन उचलल्याने दुखापत होऊ शकते. सुरुवातीला एखाद्या ट्रेनरच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करा.विश्रांती (ठशीीं): व्यायाम केल्यावर स्नायूंना वाढण्यासाठी वेळ देणे गरजेचे असते. आठवड्यातून फक्त २ ते ३ वेळा चेस्ट वर्कआउट करा आणि रोज ७-८ तासांची गाढ झोप घ्या.



# अण्णा द्रमुकमध्ये राजकीय मोठी फूट

प्रादेशिक पक्ष दुर्बल होणे भाजपच्या पथ्यावर पडणारे आहे. त्यांच्या राज्याबाहेर त्या पक्षांचे अस्तित्व नाही व त्यांच्या मदती शिवाय काँग्रेस उभी राहू शकत नाही हे भाजप ओळखून आहे.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांनी विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यात यश मिळवले आहे. त्यांना ११८ आमदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता होती. प्रत्यक्षात १४४ आमदारांनी त्यांना पाठिंबा दिला. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत विजय यांच्या 'टीव्हीके'पक्षाने १०८ जागा जिंकल्या होत्या. त्यापैकी एका जणाची सभापतीपदी निवड झाली. विजय दोन ठिकाणांहून जिंकल्याने त्यांना एका जागेचा राजीनामा द्यावा लागला. एकाच्या विजयास आव्हान देण्यात आले आहे. त्यामुळे विजय यांच्याकडे १०५ आमदार उरले होते. काँग्रेस, मार्क्सवादी व भारतीय कम्युनिस्ट, व्हीसीके, मुस्लिम लीग या पक्षांच्या पाठिंब्यामुळे ११८ आमदार गोळा करण्यात विजय यांना यश मिळाले होते. टीटीव्ही दिनकरन यांच्या 'अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघम' पक्षाच्या एकमेव आमदारानेही विजय यांना साथ दिली. ११९ असे जेमतेम बहुमत त्यांना मिळाले. स्वत: विजय यांचे एक मत आहे. जास्तीची मते कोठून आली? अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघमच्या २४ आमदारांनी विजय यांना पाठिंबा दिला. पक्षाच्या १७ जणांनी विरोधी मतदान केले. द्रमुकच्या सर्व ५९ आमदारांनी सभात्याग केला. 'एनडीए'च्या गटातील पाचजण 'तटस्थ' राहिले. पहिली शक्तिपरीक्षा जिंकून विजय सध्या तरी मुख्यमंत्री पदी राहिले आहेत.

भाजपला संधी?

तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालानंतर अण्णा द्रमुकचे एक नेते सी व्ही षण्मुगम यांनी विजय यांना पाठिंबा द्यावा अशी मागणी पक्षाचे नेते ई पलानीस्वामी यांच्याकडे केली होती. त्यांनी ती नाकारली. मग षण्मुगम यांनी विजय यांना पाठिंबा जाहीर केला. त्यांची भेटही घेतली आणि विश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले. विधानसभेतील अण्णा द्रमुक पक्ष फुटल्याचे त्यावरून दिसते. षण्मुगम यांनी तशी घोषणाही दोन दिवसांपूर्वी





केली. माजी मुख्यमंत्री जे जयललिता यांच्या निधनानंतर पक्ष एकसंध ठेवण्याचा पलानीस्वामी यांनी प्रयत्न केला पण तो कधीतरी फुटणे अटळ होते. ते आता घडले आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे सत्तेची अभिलाषा. एकदा सत्तेची चव चाखल्यानंतर सत्तेपासून दूर राहाणे, तेही अनेक वर्षे, हे भारतीय राजकारण्यांना पटत नाही. विजय यांना पाठिंबा देऊन षण्मुगम यांनी सरकारमध्येही प्रवेश केला आहे. अण्णा द्रमुक फुटल्याची, किमान सभागृहात, अधिकृत घोषणा होणे हा उपचाराचा भाग आहे. उरलेला म्हणजे सभागृहाबाहेरचा पक्ष कधी फुटतो ते लवकरच कळेल. जयललिता यांच्यावर पलानीस्वामी यांची अजूनही निष्ठा आहे. जयललिता यांच्या मागे पक्षाची धुरा कोणी सांभाळावी असा पेच निर्माण झाला आणि पक्षात पलानीस्वामी व ओ पनीरसेल्वम यांचे गट तयार झाले. सुमारे दशकभर दोघांत पक्षाच्या सत्तेसाठी रस्सीखेच चालली. ताज्या निवडणुकीपूर्वी पनीरसेल्वम द्रमुकमध्ये सामील झाले; पण त्यामुळे द्रमुकचा फायदा झाला नाही. विजय यांना बहुमत मिळाले नसल्याने द्रमुक व अण्णा द्रमुक यांनी एकत्र येण्याच्या हालचाली झाल्या; पण त्या अल्पजीवी ठरल्या. विजय यांना पाठिंबा देताना त्याचाच दाखला षण्मुगम यांनी दिला. तामिळनाडूत भारतीय जनता पक्षाला पुन्हा एकदा यश मिळालेले नाही. त्यांचा केवळ एक उमेदवार जिंकला; पण राज्यावर वर्चस्व गाजवणारे दोन प्रमुख व प्रबळ प्रादेशिक पक्ष क्षीण झाल्याचा त्यांना आनंद आहे. द्रमुक व काँग्रेस हे 'इंडिया' आघाडीचे घटक असले तरी आता त्यांच्यात दुरावा निर्माण झाला आहे. इतर भारतीय पक्षांप्रमाणेच द्रमुकही 'लवचीक' आहे. लोकसभेत त्याला सोबत घेण्याचा भाजप प्रयत्न करू लागला आहे. त्याद्वारे सभागृहात 'आपल्या बाजूचे' ५० टक्के खासदार तयार करण्याचा भाजपचा हेतू आहे. 'एक देश एक निवडणूक' हे विधेयक रेटणे त्यामुळे शक्य होईल. तामिळनाडूत पुढची निवडणूक द्रमुक, अण्णा द्रमुक व भाजप यांनी एकत्र लढवल्यास आश्चर्य वाटू नये. अण्णा द्रमुक फुटणे ही केवळ प्रादेशिक घटना नाही, तर तिचे देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहेत हे काँग्रेस व इतरांनी लक्षात घेतले

# भक्त प्रतिपालक श्री गजानन महाराज

गजानन महाराज : प्रवीण पांडे, अकोला आवाजावरून मी त्यांना थोडेफार ओळखू शकलो. (कारण त्यांनी माझा फोन व खिशातील रक्कम काढताना माझ्या कानाजवळ बोलून मला तसे सूचित केले होते). ५-७ दिवस आयसीयूमध्ये राहून मी थोडा ठीक झालो. अकोला येथे घरी आल्यावर फिजिओ-थेरपी, मसाज, व्यायाम आणि औषधोपचार झाल्यावर मी खडखडीत बरा झालो. या सर्व काळात माझ्या आजारी असलेल्या आईला अमरावती येथे आणणे शक्य नव्हते. तिची समजूत घालण्याकरिता माझे मामा डॉ. सावदेकर हे अकोला येथील माझ्या घरी जावून आले व माझ्या आईची समजूत घातली. तसेच मला काहीच झालेले नाही, असा धीर देऊन तिचे सांत्वन केले. या सर्व दिवसांमध्ये माझी आई नित्यनियमाने श्री गुरू दत्तात्रयांचे घोर कष्टोद्धारण स्तोत्र पठण करीत असे. ही झाली माझ्या जीवनात घडलेली एक अनुभूती. आता येथे प्रश्न निर्माण होतो की, त्यादिवशी गाडीत धोतर आणि अंगरखा घातलेली वृद्ध व्यक्ती कोण? इतक्या रात्री आज थंडी खूप आहे बाबा, अशी जाणीव त्यांनी मला का बरे करून दिली असावी? आरक्षणाच्या डब्यात अवचित आलेली आणि मला बघून माझी काळजी घेणारी व्यक्ती कशी आली?, की ज्यांनी अमरावतीपर्यंत माझी काळजी तर घेतलीच, पण त्यासोबतच



आपले अमरावती येथे कोणी नसेल तरीही काळजी करू नका. मी स्वतः यांना दवाखान्यात दाखल करेन व आपण लोक येईतोवर काळजी घेईन, असा प्रेमपूर्वक दिलासा देखील दिला. दुसऱ्या दिवशी हे सद्गृहस्थ मला भेटावयास सुयश हॉस्पिटल येथे आले. त्यावेळी माझ्या खिशामधून काढलेली रक्कम, भ्रमणध्वनी भावास परत केला. माझा दृढ विश्वास या गोष्टीची निश्चिती पटवतो की, माझी ही सर्व व्यवस्था श्री गजानन महाराजांनीच लावून दिली आणि माझी तब्येत एकदम ठीक केली. श्री महाराजांची आणि श्री मारुतीराया यांची कृपाच मला या जीवघेण्या संकटातून वाचविण्यास कारणीभूत आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**प्रोस्टेट कॅन्सरची शक्यता कमी करतो सहवास**-सहवास करण्याने तुम्ही फक्त फिटच राहत नाही, तर प्रोस्टेट कॅन्सरचा धोकाही सहवास कमी करतो. ❉ पुरूष जे महिन्यात २१ वेळा सहवास करतात, त्या व्यक्तीची प्रोस्टेट कॅन्सरची शक्यता कमी होते.❉ चांगल्या झोपेसाठी मदत. सहवास दरम्यान आनंद मिळत असला तरी मोठ्या प्रमाणात थकल्यासारखं होतं. ज्यामुळे चांगली झोप मिळते, पुरूषांना सहवास केल्यानंतर लगेच झोप येते.❉ सहवास दरम्यान पुरूषांच्या शरीरात ओक्सिटोसीन हार्मोन आणि प्रोलेक्टिन हार्मोनचा स्त्राव वाढत जातो. ओक्सिटोसीन हार्मोन पुरूषांना आरामाचा अनुभव देतो, तर प्रोलेक्टिन हार्मोनमुळे पुरूषांना चांगली झोप येते. **(क्रमश. )**




## २ Joke विनोद




महागाईने वैतागलेल्या चिंतोपंताकडे एका अनाथाश्रमाचे व्यवस्थापक वर्गणी मागायला गेले व म्हणाले आपण आम च्या अनाथाश्रमाला काही ना काहीतरी अवश्य द्यायला हवे. ङ्गहो. हो का नाहीफ चितोपंत म्हणाले, ङ्गमाझी चारही पोरं घेऊन जा.

## ३ Message संदेश




Har mod ka mukam nhi hota,
dil ke risto ka koi naam nhi hota,
DISCOVERY ki help se khoja hai aapko
warna aap jaise prajati ka milna aasan nhi hota

## ४ Thought सुविचार




घाम गाळल्याशिवाय दामाची खरी किंमत कळत नाही.

**संस्कृत सुभाषित**

**यत्र विद्वज्जनो नास्ति श्घ्यस्तत्राल्पधीरपि।**
**निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ।।**

अर्थ - जिथे विद्वानांचा अभाव असेल तेथे अल्पमती स्तुत्य ठरतो, जिथे झाडे नसतात, तिथे एरंड वृक्षपदाला पोचतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे-येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!'
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा
४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

## उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दु:ख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक
४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा-राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
६५. तात्पर्य
६६. दु:ख, हळहळ

## आडवे उत्तरे

१.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

## उभे उत्तरे

१.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत




## थोडक्यात/ संक्षिप्त

### मुंबई इंडियन्सच्या फलंदाजी प्रशिक्षकावर मोठी कारवाई

धर्मशाळा–मुंबई इंडियन्सचा फलंदाजी प्रशिक्षक कायरॉन पोलार्ड आयपीएल आचारसंहितेचं उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला आहे. या हंगामातील ५८व्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा सामना धर्मशाळा येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर पंजाब किंग्सशी झाला. सामन्यादरम्यानच्या त्याच्या वर्तनाबद्दल पोलार्डला दंड ठोठावण्यात आला आहे. किती ठोठावला दंड : कायरॉन पोलार्डला त्याच्या सामना शुल्काच्या १५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे आणि एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे. आयपीएलनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे, मफ्मुंबई इंडियन्सचे फलंदाजी प्रशिक्षक कायरॉन पोलार्डला खेळाडू आणि संघ अधिकाऱ्यांसाठी असलेल्या आयपीएल आचारसंहितेच्या स्तर १ चं उल्लंघन केल्याबद्दल त्यांच्या लागू सामना शुल्काच्या १५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे आणि त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंट जोडण्यात आला आहे.फ्फ कायरॉन पोलार्डची चूक काय : मुंबई इंडियन्सच्या डावादरम्यान कायरॉन पोलार्डनं चौथ्या पंचांना शिवीगाळ केल्याचे समोर आलेय. निवेदनात म्हटले आहे की, मफ्पोलार्डने आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.३ चे उल्लंघन केल्याचे आढळले आहे, जे सामन्यादरम्यान मोठ्याने आणि अील भाषा वापरण्याशी संबंधित आहे. ही घटना दुसऱ्या डावाच्या १९व्या षटकात घडली.

### हार्दिक पांड्या सोडणार मुंबई इंडियन्स?

धर्मशाळा –आयपीएल २०२६ मध्ये हार्दिक पांड्याची कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली. कर्णधार म्हणूनही हार्दिक छाप पाडण्यात अपयशी ठरला आणि मुंबई इंडियन्स प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडली. पांड्या गेल्या तीन सामन्यांपासून खेळलेला नाही अशातच हार्दिक मुंबई इंडियन्स सोडणार असल्याच्या अफवा सोशल मीडियावर जोर धरु लागल्या आहेत. यावर मुंबई इंडियन्सचा स्टार गोलंदाज शार्दुल ठाकूरनं पीबीकेएस विरुद्ध एमआय सामन्यानंतर पत्रकार परिषदेत या अफवांबाबत एक मोठं विधान केलं. हार्दिकच्या अनुपस्थितीबद्दल काय म्हणाला शार्दुल ठाकूर? : सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत शार्दुल ठाकूर हजर झाला. त्यानं हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्स सोडणार असल्याच्या अफवा फेटाळून लावल्या आणि सांगितलं की हा स्टार अष्टपैलू खेळाडू दुखापतीमुळं संघाबाहेर आहे. तो म्हणाला, मफ्सोशल मीडियावर बरीच चर्चा सुरु आहे. काही गोष्टी खऱ्या आहेत आणि काही पूर्णपणे खोट्या आहेत. अंतिमत: संघ व्यवस्थापन निर्णय घेईल. जर आपण फक्त हार्दिक पांड्याबद्दल बोललो, तर तो दुखापतग्रस्त आहे आणि संघासोबत नाही.फ्फ शार्दुल ठाकूर पुढं म्हणाले, मफ्पांड्या रायपूरला गेला होता पण खेळू शकला नाही. तो सध्या मुंबईत सराव करत आहे. मला आशा आहे की तो कोलकाताला येईल आणि एक सामना खेळेल.

### मॅच विनर खेळाडू दुखापतीने थेट मायदेशी परतला

मुंबई –इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या प्लेऑफची शर्यत अत्यंत रोमांचक झाली आहे. संघ आपले प्लेऑफमधील स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, चेन्नई सुपर किंग्सचा परदेशी गोलंदाज जेमी ओव्हरटन दुखापतीमुळे आपल्या मायदेशी परतला आहे. नजेमी ओव्हरटनने या आयपीएलमध्ये १० सामन्यांमध्ये ८.८९ च्या इकॉनॉमीने १४ बळी घेतले आहेत. चेन्नई सुरुवातीपासूनच दुखापतींच्या समस्येशी झुंजत आहे. आयुष म्हात्रे आणि खलील अहमद हे आधीच दुखापतीमुळे संघाबाहेर आहेत.चेन्नई सुपर किंग्सने त्यांच्या अधिकृत मएक्सफ हँडलवरील एका पोस्टमध्ये ही घोषणा केली. चेन्नईने लिहिले की, मफ्जेमी ओव्हरटनला उजव्या मांडीला दुखापत झाली.. चेन्नईच्या अंशुल कंबोजने या आयपीएल हंगामात ११ सामन्यांमध्ये ९.२० च्या इकॉनॉमीने १९ बळी घेतले आहेत. संजू सॅमसनने ११ सामन्यांमध्ये १६९.२९ च्या स्ट्राईक रेटने ४३० धावा केल्या आहेत.सीएसकेची प्लेऑफमध्ये पोहोचण्याची शक्यता काय चेन्नई सुपर किंग्सच्या (ण्एख) सलग तिसऱ्या विजयामुळे त्यांच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या शक्यता लक्षणीयरीत्या वाढल्या आहेत.

# लखनौकडून पराभूत होऊनही उद्या कडे प्लेऑफ मध्ये जाण्याची संधी! कसं आहे समीकरण?

**नवी मुंबई:** आयपीएल २०२६ स्पर्धेतील ५९ वा सामना लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्स या दोन्ही संघांमध्ये पडला. लखनौला या हंगामात हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. पण घरच्या मैदानावर खेळताना लखनौने आपल्या चाहत्यांना विजयाचं गिफ्ट दिलं.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना चेन्नई सुपर किंग्स संघाने १८७ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या लखनौ सुपर जायंट्स संघाकडून मिचेल मार्शने ९० धावांची वादळी खेळी केली. शेवटी निकोलस पूरन आणि मुकुल चौधरीने लखनौला विजय मिळवून दिला. लखनौचा संघ आधीपासून प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. पण चेन्नईचा संघ अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहे. दरम्यान या पराभवानंतर चेन्नईसाठी कसं आहे प्लेऑफमध्ये जाण्याचं समीकरण? जाणून घ्या.

चेन्नई प्लेऑफमध्ये जाणार का?

ङ्गमाझे वडील मरता मरताःङ्ख, 'शोले'मधील गब्बरच्या मुलाने सांगितली 'ती' आठवण; अमिताभ बच्चन यांच्याबद्दल म्हणाला, ङ्गत्यांनी खूपःङ्ख माधुरी दीक्षित 'या' अभिनेत्याच्या होती प्रेमात; मात्र घडलं असं काही कीः; 'त्या' कारणामुळे केलेलं ब्रेकअप



लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात झालेल्या सामन्यात चेन्नईला पराभवाचा सामना करावा लागला आहे. या सामन्यानंतर चेन्नईसाठी प्लेऑफमध्ये जाण्याचं समीकरण कसं आहे?

ङ्गकाम संपलं, माणसं गेली, पण तो कोपऱ्यातच उभाःङ्ख, जेव्हा माधुरी दीक्षितला पाहण्यासाठी एका चाहत्याने ओलांडलेली मर्यादा; अभिनेत्री म्हणालेलीःचेन्नई सुपर किंग्स संघाने आतापर्यंत १२ पैकी ६ सामने जिंकले आहेत. तर ६ सामने गमावले आहेत. १२ सामान्यांमध्ये चेन्नईने १२ गुणांची कमाई केली आहे. चेन्नईला अजूनही प्लेऑफमध्ये जाण्याची संधी आहे. त्यासाठी पुढील दोन्ही सामन्यांमध्ये विजय मिळवणं गरजेचं असणार आहे. चेन्नईचे पुढील सामने गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघाविरुद्ध होणार आहेत. पण हे दोन्ही सामने जिंकूनही चेन्नईला इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावं लागेल. कारण १६ गुणांवर पोहोचल्यानंतर नेट रनरेट महत्वाचा ठरेल.लखनौच्या एकाना स्टेडियममध्ये पार पडलेल्या सामन्यात लखनौने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्स संघाला हवी तशी सुरुवात करता आली नाही. चेन्नईकडून फलंदाजी करताना कार्तिक शर्माने सर्वाधिक ७१ धावांची खेळी केली. तर शिवम दुबेने नाबाद ३२ धावा केल्या. तर डेवाल्ड ब्रेव्हिसने २५ धावांचे योगदान दिले. या खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्स संघाने २० षटकांअखेर ५ गडी बाद १८७ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या लखनौ सुपर जायंट्स संघाकडून मिचेल मार्शने सर्वाधिक ९० धावांची खेळी केली. तर जोश इंग्लिसने ३५ आणि शेवटी निकोलस पूरनने नाबाद ३२ धावांची खेळी करून लखनौला हा सामना ७ गडी राखून जिंकून दिला.

## आता लग्नाची चर्चा! हार्दिक पांड्या लवकरच दुसरं लग्न करणार?

मुंबई–मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या आता लवकर दुसरे लग्न करणार अशी वृतांची माहिति आहे. मागील काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत पाहायला मिळाला आहे, त्याने मागील तीन सामन्यामध्ये तो खेळलेला नाही. आता वृतांनी माहिती दिली आहे की लवकर हार्दिक पांड्या हा त्याची गर्लफ्रेंड महिका शर्मासोबत लग्नबंधनात अडकणार आहे. मागील काही दिवसांपासून सोशल मिडियावर मुंबई इंडियन्स संघामध्ये हार्दिक पांड्या सामील झाला नाही. त्यामुळे आता त्याच्या दुसऱ्या लग्नाच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. या फक्त अफवा आहेत की ही खरी बातमी आहे हे अजूनपर्यंत सांगितलेले नाही.एका सोशल मिडियावर एक पोस्ट काही क्षणातच व्हायरल झाली आहे यामध्ये हार्दिक पांड्या हा २२ मे रोजी लग्नबंधनात अडकणार आहे अशी माहिती शेअर करण्यात आली आहे. या पोस्टमध्ये असेही लिहीले आहे की हार्दिक पांड्याच्या क्रिकेटमधून अचानक गायब होण्यामागे आणि त्याच्या आगामी लग्नाच्या अफवांमागे असलेली धक्कादायक कहाणी आहे. हार्दिक पांड्या हा २२ मे रोजी उदयपूर येथे महिका शर्मासोबत लग्न करणार आहे असे सांगितले जात आहे. बीसीसीआयने गर्लफेंड कल्चर बंद केल्यानंतर आता तो लग्न करणार आहे असा अंदाज लावला जात आहे. बीसीसीआयच्या या नियमांमुळे मागील तीन आयपीएलचे सामने हार्दिक खेळला नाही असेही सांगितले जात आहे. माहिका शर्मा आणि हार्दिक पांड्या हे दोघे मागील काही महिन्यांपासून एकमेकांना डेट करत आहेत. दोघांनी उघडपणे त्यांच्या नात्याची कबुली केली आहे. सोशल मिडियावर देखील अनेकदा दोघे एकमेकांचे फोटो शेअर करत असतात. २०२६ च्या विश्वचषकामध्ये देखील महिका अनेकदा हार्दिक पांड्याला सपोर्ट करण्यासाठी स्टेडियममध्ये आली आहे.

## ना अय्यर, ना बुमराह, 'हा' खेळाडू होणार भारताचा नवा टी-२० कर्णधार! रवि शास्त्रींची मोठी भविष्यवाणी

**नवी दिल्ली :** भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार म्हणून सूर्यकुमार यादवची कामगिरी प्रभावी राहिली आहे. आपल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्याने एकही द्विपक्षीय मालिका गमावलेली नाही. याशिवाय आशिया चषकही जिंकून दिली. महत्त्वाचं म्हणजे सूर्याच्या नेतृत्त्वाखाली भारताने सलग दुसरा टी-२० विश्वचषक पटकावला आणि इतिहास घडवला. कर्णधार म्हणून त्याची कामगिरी उत्कृष्ट असली तरी, त्याची फलंदाजीची सरासरी २५ च्या खाली घसरली आहे, जी त्याच्या मानकांनुसार खूपच कमी आहे. आता सूर्याच्या जागी भविष्यातील टी-२० कर्णधार कोण असणार, याची भविष्यवाणी रवी शास्त्रींनी केली आहे.

गेल्या वर्षभरात २०२५ मध्ये सूर्यादादाच्या बॅटमधून अपेक्षित अशी कामगिरी पाहायला मिळालेली नाही. तर २०२६ मध्ये टी-२० विश्वचषकातही काही सामने वगळता सूर्या मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला होता. दरम्यान यंदाच्या आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्ससाठी त्याचा सध्याचा फॉर्मही निराशाजनक राहिला आहे, ज्यामुळे नजीकच्या काळात भारतीय टी-२० संघाचा कर्णधार बदलू शकतो अशी चर्चा सुरू आहे.




रवी शास्त्रींच्या मते, जर निवडकर्ते एखाद्या प्रबळ दावेदाराच्या शोधात असतील, तर राजस्थान रॉयल्सचं नेतृत्त्व केलेल्या आणि कर्णधारपदाच्या अनुभवामुळे संजू सॅमसन आघाडीवर असायला हवा. 'आयसीसी रिव्ह्यू' या कार्यक्रमात प्रसिद्ध क्रीडा निवेदिका संजना गणेशन यांच्याशी बोलताना रवी शास्त्री म्हणाले, ङ्ग२०२८ मध्ये होणाऱ्या पुढील टी२० विश्वचषकापर्यंत भारताला नवीन कर्णधाराच्या शोधात असणार आहे. अर्थात हे सूर्या पुढील काही वर्षांत कशी कामगिरी करतो यावर अवलंबून असेल.ङ्ख

त्याला शाळेत डब्बा घेऊन जावा लागत नाहीः.ङ्ख, गश्मीरच्या घरी टीव्ही लावण्यावरही आहे बंदी; अभिनेत्याने मुलासाठी घेतलेत 'हे' निर्णय, म्हणालाः रवी शास्त्री पुढे म्हणाले, ङ्गपण संजू सॅमसनने यापूर्वी राजस्थानचं नेतृत्त्व केल्यामुळे, तो या पदासाठी एक प्रबळ दावेदार म्हणून सिद्ध झाला आहे. फलंदाजीच्या वरच्या फळीत त्याचं स्थान पक्क आहे आणि तो एक अत्यंत आक्रमक फलंदाज आहे. त्यामुळे, पुढील दोन-तीन वर्षांत संजूसाठी आणखी मोठ्या गोष्टींची ही केवळ सुरुवात आहे, असं मला वाटतं. स्पर्धेत अनेक मॅचविनिं खेळींमुळे सॅमसनला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून गौरविण्यात आलं. सूर्यकुमारप्रमाणेच हा यष्टीरक्षक-फलंदाज सध्या आयपीएलमध्ये खेळत आहे. भारताचा पुढील टी-२० आंतरराष्ट्रीय दौरा आयर्लंडमध्ये होणार असून, तिथे ते यजमान संघाविरुद्ध दोन सामन्यांची मालिका खेळतील.

## श्रेयसला नाही तर या खेळाडूला कॅप्टन करा

मुंबई–टीम इंडियाचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव हा मागच्या बऱ्याच काळापासून बॅटिंगमध्ये संघर्ष करत आहे. पुढच्या मोसमात सूर्या ३७ वर्षांचा होईल, त्यामुळे आता बीसीसीआय आणि निवड समिती टीम इंडियाच्या पुढच्या टी-२० कर्णधाराबाबत विचार करत आहे. पुढचा टी-२० वर्ल्ड कप २०२८ साली होणार आहे, तोपर्यंत सूर्या ३९ वर्षांचा होईल, त्यामुळे आता कर्णधारपदासाठी श्रेयस अय्यर, हार्दिक पांड्या, शुभमन गिल आणि संजू सॅमसन या तिघांची नावं आघाडीवर आहेत. बीसीसीआयने सध्या तरी सूर्या कॅप्टन म्हणून कायम राहणार असल्याचं स्पष्ट केलं, पण नजीकच्या भविष्यात टीम इंडियाला नवा टी२० कर्णधार मिळू शकतो.




टीम इंडियाचे माजी हेड कोच रवी शास्त्री यांनी मात्र टी-२० टीमच्या कर्णधाराबद्दल वेगळं मत मांडलं आहे. आयसीसीच्या रिव्ह्यू मीटिंगमध्ये रवी शास्त्री बोलत होते. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारताने टी-२० वर्ल्ड कप जिंकला, पण २०२८ चा टी-२० वर्ल्ड कप लक्षात घेता संजू सॅमसन टीम इंडियासाठी पर्याय असू शकतो, असं रवी शास्त्री म्हणाले आहेत.

'संजू सॅमसन फक्त प्रतिभावान खेळाडू नाही तर मॅच विनर आहे आणि लीडर म्हणूनही त्याने स्वत:ला सिद्ध केलं आहे. आयसीसीच्या मोठ्या स्पर्धांमध्ये संजूने ज्याप्रकारे जबाबादरी सांभाळली, यातून त्याची मॅच्युअरिटी दिसते', असं रवी शास्त्री म्हणाले आहेत.'सॅमसनच्या टॅलेंटबद्दल कधीच प्रश्न नव्हता, पण त्याने जे सातत्य दाखवलं त्याने अनेकांची तोंडं बंद झाली. आधीही सगळेच जण त्याच्या खेळाचं कौतुक करायचे, पण तो सातत्याने रन करत नाही, अशी अनेकांची तक्रार होती. याच कारणामुळे तो टीमच्या बाहेर होता. पुढच्या दोन-तीन वर्षात संजू आणखी चांगला खेळाडू होईल. आयपीएल आणि इंटरनॅशनल क्रिकेट दोन्ही ठिकाणी त्याने मॅच्युअरिटी दाखवली आहे, त्यामुळे तो कॅप्टन्सीचा दावेदार आहे', असं वक्तव्य रवी शास्त्रींनी केले आहे.

## चेन्नईच्या संघात कुलदीपची एन्ट्री तर आरसीबी मध्येही मोठा बदल

चेन्नई–आयपीएलच्या १९ व्या हंगामात प्लेऑफमध्ये कोणते संघ पोहोचणार याकडे सर्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे. आयपीएल २०२६चा हंगाम अंतिम टप्प्याकडे जात असताना चेन्नई सुपर किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु या दोन्ही संघांमध्ये मोठे बदल झाले आहेत.चेन्नईने दुखापतग्रस्त खलील अहमद याच्या जागी वेगवान गोलंदाज कुलदीप यादवला संघात सामील केले आहे. तर गतविजेत्या आरसीबीने नुवान तुषाराच्या जागी इंग्लंडचा वेगवान गोलंदाज रिचर्ड ग्लेसन याला संघात घेतले आहे. चेन्नईच्या संघात कुलदीप यादवची एन्ट्री सीएसकेने खलील अहमदच्या जागी कुलदीप यादवला ३० लाख रुपयांमध्ये संघात घेतले आहे. कुलदीप यादवने यापूर्वी राजस्थान रॉयल्स कडून २०२१ मध्ये आयपीएल पदार्पण केले होते. आतापर्यंत त्याने आयपीएलमध्ये ३ सामने खेळले असून त्यात २ विकेट घेतल्या आहेत.

आरसीबीमध्ये रिचर्ड ग्लीसन- इंग्लंडचा वेगवान गोलंदाज रिचर्ड ग्लीसनला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने नुवान तुषाराच्या जागी संघात घेतले आहे. ग्लीसनने आयपीएलमध्ये आतापर्यंत २ सामने खेळले असून त्याच्या नावावर २ विकेट आहेत. बंगळुरूने त्याला १.६ कोटी रुपयांत संघात घेतले आहे.ग्लीसनने आंतरराष्ट्रीय स्तरावरही इंग्लंडसाठी ६ टी-२० सामने खेळले असून ९ विकेट घेतल्या आहेत. त्याची सर्वोत्तम कामगिरी १५ धावांत ३ विकेट अशी आहे. ग्लीसन आतापर्यंत १४५ टी-२० सामने खेळला आहे. त्यात त्याने १७० विकेट्स घेतल्या आहेत. टी- २० करियरमध्ये ५३३ ही त्याची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

## पाकिस्तानच्या सनाचा वर्ल्ड रेकॉर्ड! महिलांच्या टी-२० अशी कामगिरी करणारी पहिली फलंदाज



**लाहोर:** पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने झिम्बाब्वेविरूद्धच्या सामन्यात नवा वर्ल्ड रेकॉर्ड रचला आहे.

टी-२० इतिहासात आता एक नवा विश्वविक्रम रचला गेला आहे.पाकिस्तान महिला संघाची कर्णधार फातिमा सनाच्या स्फोटक फलंदाजीने सर्वांनाच आश्चर्यचकित केलं आहे. सध्या पाकिस्तानचा महिला संघ टी-२० विश्वचक २०२६ची तयारी करत आहे. यादरम्यान पाकिस्तान आणि झिम्बाब्वे महिला संघांमध्ये टी-२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील सामन्यादरम्यान फातिमा सनाने मोठा विक्रम आपल्या नावे केला. पाकिस्तानची कर्णधारा फातिमाने झिम्बाब्वेविरुद्धच्या तिसऱ्या महिला टी-२० सामन्यात अवघ्या १५ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावून इतिहास घडवला आहे. महिला टी-२० क्रिकेटमधील हे सर्वात जलद अर्धशतक आहे. कराची येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात, २४ वर्षीय फातिमा सनाने फलंदाजीला उतरताच झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. तिने अवघ्या १५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण करून पूर्वीचा विक्रम मोडला. सनाने या सामन्यात सर्वात जलद अर्धशतकासह १९ चेंडूत १० चौकार व २ षटकारांच्या मदतीने ६२ धावांची खेळी केली.

महिलांच्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम सोफी डिव्हाईन, फिबी लिचफिल्ड आणि ऋचा घोष यांच्या नावावर संयुक्तपणे होता, ज्यांनी प्रत्येकी १८ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं होतं. आता फातिमा सना हिने १५ चेंडूत अर्धशतक झळकावत पहिलं स्थान गाठलं आहे. फातिमाचा हा वर्ल्ड रेकॉर्ड फक्त टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपुरता मर्यादित नसून तिने महिलांच्या टी-२० क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतकाच्या विक्रमाची बरोबरीही केली.

यापूर्वी हा पराक्रम २०२२ मध्ये वॉरविकशायरसाठी मेरी केलीने आणि या वर्षी न्यूझीलंडच्या सुपर स्मॅश स्पर्धेत लॉरा हॅरिसने केला होता.

पाकिस्तानसाठी सर्वात जलद टी-२० आंतरराष्ट्रीय अर्धशतकाचा विक्रम निदा दारच्या नावावर होता, जिने २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २० चेंडूत अर्धशतक झळकावलं होतं. आता हा विक्रम फातिमा सनाने आपल्या नावावर केला आहे.

प्रथम फलंदाजी करताना, १७व्या षटकात फातिमा सना फलंदाजीला आली तेव्हा पाकिस्तानची धावसंख्या ४ बाद १५२ धावा होती. त्यानंतर फातिमा सनाने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची धुलाई करायला सुरूवात केली. तिने मिशेल मावुंगाच्या गोलंदाजीवर चौकार मारून आपलं खातं उघडलं आणि त्यानंतर कुडझाई चिगोराच्या षटकात सलग चार चौकार ठोकून सामन्याचं चित्रच पालटलं.

डावाच्या १९ व्या षटकात फातिमाने नोमवेलो सिबांडाच्या गोलंदाजीवर तर कहर केला. या षटकात तिने ४, ४, ६, ६ आणि ४ अशा २४ धावा कुटल्या. अवघ्या १४ चेंडूंमध्ये ४८ धावा करणाऱ्या फातिमाने शेवटच्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर दोन धावा घेत आपले ऐतिहासिक अर्धशतक पूर्ण केलं.

# हिप्परगा येथून 'जलसमृद्ध एकात्मिक विकास अभियान' अंतर्गत मोफत आरोग्य शिबिराचा शुभारंभ

## सात वर्षांत औसा तालुक्यातील ७० गावांचा होणार परिपूर्ण विकास - आ. अभिमन्यू पवार



**औसा/प्रतिनिधी :** औसा तालुक्यातील ७० गावांचा सात वर्षांच्या कालावधीत जलसमृद्ध आणि एकात्मिक पद्धतीने परिपूर्ण विकास करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प आ अभिमन्यू पवार यांनी हाती घेतला असून या अभियानाची सुरुवात पायलट प्रोजेक्ट म्हणून सात गावांपासून करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत गावांचा केवळ पायाभूत विकास नव्हे तर आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा, महिलांचे आरोग्य, व्यसनमुक्ती, दिव्यांग कल्याण आणि सामाजिक सक्षमीकरण अशा विविध अंगांनी सर्वांगीण विकास साधला जाणार आहे.

या अभियानांतर्गत औसा तालुक्यातील हिप्परगा (क) येथे गुरुवारी (दि. १५ मे) भव्य आरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत भास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते पाटील, क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष परीक्षित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, अभियानांतर्गत सात गावांतील प्रत्येक नागरिकाची सखोल आरोग्य तपासणी करण्यात येणार असून तब्बल ७२ विविध वैद्यकीय तपासण्यांद्वारे नागरिकांच्या आरोग्याची माहिती संकलित केली जाणार आहे. तपासणीत दुर्धर आजार आढळलेल्या रुग्णांवर पुणे आणि मुंबई येथील नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत उपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत. प्रत्येक नागरिकासाठी डिजिटल आरोग्य कार्ड तयार करण्यात येणार असून ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देणारी 'वयवंदना योजना' प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिलांच्या आरोग्यावर विशेष भर देत तोंडाचा कर्करोग, स्तन कर्करोग आणि गर्भाशय कर्करोग तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे, कुपोषणमुक्तीसाठी जनजागृती, शाळा आणि अंगणवाड्यांमधील पौष्टिक आहार तपासणी, व्यसनमुक्ती पथके, दिव्यांग बांधवांना साहित्य वाटप, ढइ मुक्त गाव अभियान, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, एकल महिलांची आरोग्य तपासणी आणि सर्व महिलांना रक्तगट कार्ड वितरण असे अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम अभियानांतर्गत राबविले जाणार आहेत.निरोगी गाव, सक्षम कुटुंब आणि आरोग्यदायी समाज घडविण्याच्या दिशेने हे अभियान अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, अशी भावना आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी डॉ. भारत भास्टेवाड यांनी नागरिकांना या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. लोकसहभागाशिवाय गावांचा सर्वांगीण विकास शक्य नसल्याचे सांगत त्यांनी ग्रामस्थांनी जागरूकपणे अभियानात सहभागी व्हावे असे नमूद केले. शासनाकडून जलसमृद्ध आणि एकात्मिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे सांगून आरोग्य शिबिरात विशेषतः महिलांनी आरोग्य शिबिरांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. अनेक गंभीर आजार सुरुवातीला जाणवत नाहीत, मात्र तपासण्यांमधून ते निदर्शनास येतात. त्यामुळे वेळेवर आरोग्य तपासणी करणे अत्यंत गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी शासनाच्या मोफत आरोग्य योजनांची माहिती देताना सांगितले की, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत आणि कॅशलेस उपचार उपलब्ध होतात. राज्यातील तसेच देशातील संलग्नित शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये हे उपचार घेता येतात. अनेक नागरिकांना या योजनांची माहिती नसल्याने त्यांनी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

या आरोग्य शिबिरासाठी पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, शोभा अभिमन्यू पवार, उपसभापती अमोल पाटील, बाजार समिती सभापती चंद्रशेखर सोनावणे, जिल्हा परिषद सदस्या दिपाली भोसले, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनशाम अडसूळ, सरपंच संतोष गोरे, उपसरपंच नितीन म्हेत्रे,यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करा : भाजयुमोची मागणी



**लातूर/प्रतिनिधी :** देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने लातूर जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. भाजयुमोचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष ओमअप्पा शिवमुर्ती धरणे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.

भाजयुमोने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छएएढ पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये संताप आणि असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे घेतलेली मेहनत, पालकांनी केलेला आर्थिक खर्च आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेला विश्वास या घटनेमुळे डळमळीत झाला आहे. या प्रकारामुळे देशाच्या शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून दोषींना कठोर शिक्षा होणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नाशिक आणि कोल्हापूरनंतर आता या प्रकरणात लातूरचे नाव चर्चेत येत असल्याने संबंधित प्रश्नपत्रिका, हस्ताक्षर, कागदपत्रे आणि इतर पुरावे यांची न्यायवैद्यकीय तपासणी करण्यात यावी, अशी मागणी भाजयुमोच्या वतीने करण्यात आली. तसेच या गैरप्रकाराचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्याशी संबंधित मध्यस्थ, खाजगी क्लासेस चालक, वसतिगृह चालक तसेच इतर संबंधित व्यक्तींनाही तपासाच्या कक्षेत आणावे, अशी मागणी करण्यात आली. पेपरफुटीसारखा गंभीर प्रकार हा देशाच्या भविष्यासोबत केलेला विश्वासघात असून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरणाऱ्यांना कोणतीही माफी मिळू नये, अशी भूमिका भाजयुमोने स्पष्ट केली. संपूर्ण रॅकेट उघड करून संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. या वेळी जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे म्हणाले, देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना कोणतीही माफी मिळू नये. निष्पक्ष तपास होऊन संपूर्ण सत्य बाहेर आले पाहिजे आणि दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे.


या वेळी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे, सरचिटणीस अक्षय स्वामी, उपाध्यक्ष धीरज मोरे, गणेश बेद्रे, मंडळाध्यक्ष रोहित चवळे, चिटणीस सचिन गुट्टे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पाणंद अतिक्रमणापोटी शेतकऱ्याला प्रथमच दंड: नागलगाव-सुमठाण पाणंद रस्ता मोकळा

**उदगीर/प्रतिनिधी:** उदगीर तालुक्यातील नागलगाव ते सुमठाण या गावांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण अखेर न्यायालयाच्या आदेशानुसार हटवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्याला न्यायालयाने तब्बल २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला असून, उदगीर तालुक्याच्या इतिहासात अशा प्रकारची दंडात्मक कारवाई होण्याची ही पहिलीच वेळ आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या मार्गावरील रस्ता एका शेतकऱ्याने अतिक्रमण करून बंद केल्याने परिसरातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. यावरून अनेकदा वादाचे प्रसंगही ओढवले होते. ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर महसूल प्रशासनाने हे प्रकरण न्यायालयात दाखल केले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर महसूल, पंचायत विभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून कडक बंदोबस्तात हे अतिक्रमण हटवले. जेसीबीच्या साहाय्याने अडथळे दूर करून रस्ता खुला करण्यात आला. पाणंद रस्त्यावरील वादात सहसा केवळ अतिक्रमण हटवण्यावर भर दिला जातो; मात्र या प्रकरणात न्यायालयाने ठोठावलेला २५ हजार रुपयांचा दंड तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. प्रशासकीय स्तरावर वारंवार सूचना देऊनही जेव्हा अतिक्रमण काढले जात नाही, तेव्हा अशा कठोर कायदेशीर भूमिकेची गरज असते. या कारवाईमुळे भविष्यात सार्वजनिक रस्ते अडवणाऱ्या प्रवृत्तींना चाप बसणार असून, प्रशासनाचा आणि न्यायव्यवस्थेचा वचक निर्माण झाला आहे. यामुळे शेतकरी हिताला प्राधान्य मिळाले आहे.

# २६ वर्षांपासून प्रलंबित सातबारा दुरुस्तीचा प्रश्न

## जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकारामुळे दोन दिवसांत निकाली



**लातूर/प्रतिनिधी :** एका तलाठ्याच्या चुकीमुळे सातबारा उताऱ्यावर २६ वर्षांपूर्वी झालेली चुकीची नोंद दुरुस्त करण्यासाठी पाठपुरावा करणाऱ्या एका ८५ वर्षीय वृद्धाला लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या संवेदनशीलतेमुळे अखेर न्याय मिळाला आहे. वयोवृद्ध शेतकरी प्रभाकर प्रयाग यांचा काही वर्षांपासून रेंगाळलेला सातबारा दुरुस्तीचा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ दोन दिवसांत मार्गी लावला.

लातूर येथील रहिवासी प्रभाकर विनायकराव प्रयाग (वय ८५) यांची खोपेगाव शिवारात वडिलोपार्जित जमीन आहे. २६ वर्षांपूर्वी वासनगाव तलावाच्या कालव्यासाठी या परिसरातील जमीन संपादित करण्यात आली होती. हा कालवा वास्तविक प्रभाकर प्रयाग यांच्या भावाच्या शेतातून गेला होता. मात्र, तत्कालीन तलाठ्याच्या नजरचुकीमुळे श्री. प्रयाग यांच्याही सातबाऱ्यावर '६ आर' जमीन संपादित झाल्याची नोंद करण्यात आली. ही चुकीची नोंद काढण्यासाठी श्री. प्रयाग मागील काही वर्षांपासून प्रशासनाकडे दाद मागत होते, मात्र हा तांत्रिक पेच सुटत नव्हता.

या प्रकरणाची वस्तुस्थिती जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या निदर्शनास येताच त्यांनी विलंब न लावता स्वतः या प्रकरणाची फाईल मागवून घेतली. प्रकरणाचे गांभीर्य आणि श्री. प्रयाग यांचे वय लक्षात घेऊन त्यांनी संबंधित विभागाला तातडीने दुरुस्तीचे आदेश दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशानंतर प्रशासकीय यंत्रणेने चक्रे फिरवून अवघ्या दोन दिवसांत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आणि त्रुटीमुक्त नवीन सातबारा तयार केला. गुरुवार, १४ मे २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी श्री. प्रयाग यांना आपल्या कार्यालयात बोलावून त्यांच्या हाती दुरुस्त केलेला सातबारा सुपुर्द केला. २६ वर्षांचा प्रश्न मार्गी लागल्याने श्री. प्रयाग यांनी अत्यंत भावूक होत जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.

महसूल विभागाशी संबंधित प्रकरणे प्रलंबित असल्यास किंवा संबंधित कर्मचारी दाद देत नसल्यास, कोणत्याही कामासाठी विहित शुल्कापेक्षा जास्त पैशांची मागणी केल्यास नागरिकांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे. याबाबत तातडीने कार्यवाहीच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिल्या आहेत. तसेच नागरिक थेट जिल्हाधिकारी कार्यालयातही याबाबत अर्ज करू शकतात, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

# दोन एकरातील दोडका पीक उद्ध्वस्त: अवकाळीमुळे शेतकऱ्याला मोठा तोटा

**खामसवाडी/प्रतिनिधी:** कळंब तालुक्यातील नागझरवाडी येथील प्रयोगशील शेतकरी रामदास पवार यांच्या भाजीपाला शेतीला अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. गेल्या पाच वर्षांपासून दोन एकर क्षेत्रावर सातत्याने नवनवीन प्रयोग करत भाजीपाला उत्पादनातून त्यांनी आर्थिक प्रगती साधली होती. मात्र यंदा झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे त्यांच्या दोडका पिकाचा मांडव पूर्णतः जमीनदोस्त झाला असून मोठे नुकसान झाले आहे. नागझरवाडी हे माळरान व कोरडवाहू शेतीचे गाव आहे. येथील बहुतांश कुटुंबे शेती व मजुरीवर अवलंबून आहेत.

अशा परिस्थितीत रामदास पवार यांनी उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य वापर करत भाजीपाला शेतीकडे वळण्याचा निर्णय घेतला. गेल्या पाच वर्षांत त्यांनी भाजीपाला उत्पादनातून स्थिर उत्पन्न मिळवत कुटुंबाला आधार दिला आहे. यंदा त्यांनी फेब्रुवारी महिन्यात एका एकर क्षेत्रावर दोडका पिकाची लागवड केली होती. सुमारे ८० हजार रुपये खर्च करून उभारलेल्या या पिकातून अवघ्या सव्वा महिन्यात उत्पादन सुरू झाले होते. केवळ २० दिवसांतच सुमारे १ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाल्याने शेतकऱ्याला दिलासा मिळत होता. मात्र अचानक आलेल्या अवकाळी पावसाने व वादळी वाऱ्याने संपूर्ण मांडव कोसळून पीक उद्ध्वस्त झाले.

# दौंड-मनमाड दुहेरीकरण कामामुळे सोलापूर विभागातील काही रेल्वेगाड्यांचे मार्ग बदलले



**सोलापूर/प्रतिनिधी:** पुणे विभागातील दौंड-मनमाड दुहेरीकरण प्रकल्पाअंतर्गत अकोलनेर-नगर-निंबळक स्थानकांदरम्यान कमिशनिंगसाठी मध्य रेल्वेकडून दि. १६, १७ व १८ मे २०२६ रोजी वाहतूक व पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामामुळे सोलापूर विभागामार्गे धावणाऱ्या काही रेल्वेगाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आले असून त्याचा परिणाम प्रवाशांच्या प्रवासावर होणार आहे.

गाडी क्रमांक १७३२३ एसएसएस हुबळी-बनारस एक्स्प्रेस ही दि. १५ मे २०२६ रोजीच्या प्रवासासाठी सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे वळविण्यात येणार आहे. तसेच गाडी क्रमांक १२६२७ केएसआर बेंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस ही दि. १५, १६ व १७ मे २०२६ रोजी सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे धावणार आहे.

याचप्रमाणे गाडी क्रमांक २०६५७ एसएसएस हुबळी-हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस ही दि. १५ मे २०२६ रोजी सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे वळविण्यात येईल. तर गाडी क्रमांक २०६५८ हजरत निजामुद्दीन-एसएसएस हुबळी एक्सप्रेस ही दि. १७ मे २०२६ रोजी मनमाड-छत्रपती संभाजीनगर-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी-सोलापूर मार्गे धावणार आहे.

रेल्वे प्रशासनाने सांगितले की, पायाभूत सुविधा उन्नतीकरण व सुरक्षिततेच्या दृष्टीने हे ब्लॉक अत्यावश्यक आहेत. त्यामुळे प्रवाशांनी होणाऱ्या गैरसोयीबद्दल सहकार्य करावे तसेच प्रवासाचे नियोजन करताना या बदलांची नोंद घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# रासायनिक खतांचा वापर कमी करून नैसर्गिक शेतीकडे वळा; रासायनिक खतांसाठी ग्रीस्टॅकवर नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** पश्चिम आशियाई देशांतील सद्यस्थिती आणि जागतिक संकटाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र व राज्य शासनाने कृषी क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. त्यानुसार रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलेल्या आवाहनानुसार, राज्य शासनाने कृषी विभागामार्फत विविध उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत बिघडत असून, जागतिक बाजारपेठेतील खतांच्या उपलब्धतेवरही परिणाम होत आहे. ही परिस्थिती विचारात घेता, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक रासायनिक शेतीकडून नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक आहे. यामुळे केवळ जमिनीची सुपीकता टिकणार नाही, तर उत्पादन खर्च कमी होऊन विषमुक्त अन्ननिर्मितीला चालना मिळेल.

**ग्रीस्टॅकवर नोंदणी करण्याचे आवाहन**


भविष्यात रासायनिक खतांची उपलब्धता सुरळीत राहावी आणि खतांचे वाटप पारदर्शक व योग्य पद्धतीने व्हावे, यासाठी प्रशासकीय स्तरावर नियोजन करण्यात येत आहे. या नियोजनाचा भाग म्हणून शेतकऱ्यांनी 'ग्रीस्टॅक' या प्रणालीवर आपली नोंदणी करणे अनिवार्य आहे. या नोंदणीमुळे खतांचा संतुलित वापर आणि शासकीय योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे सोपे होणार आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचे माती परीक्षण करून आवश्यकतेनुसारच रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा. रासायनिक खतांना पर्याय म्हणून जैविक खते, हिरवळीची खते आणि सेंद्रिय खतांच्या वापरावर भर द्यावा. खतांच्या उपलब्धतेबाबत किंवा तांत्रिक अडचणींबाबत शेतकऱ्यांनी आपल्या भागातील कृषी सहाय्यक किंवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी बदलत्या जागतिक परिस्थितीचा विचार करून आणि शासनाच्या धोरणांना प्रतिसाद देऊन नैसर्गिक शेतीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# संजय गांधी निराधार योजना समिती गठीत; रेणापूरच्या अध्यक्षपदी सतीश आंबेकर तर लातूरच्या अध्यक्षपदी बन्सी भिसे यांची नियुक्ती

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुका आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार गठित करण्यात आली असून रेणापूर तालुका समितीचे अध्यक्षपदी सतीश आंबेकर यांची तर लातूर तालुका समिती अध्यक्षपदी बन्सी भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रेणापूर तालुका आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार गठीत करण्यात आली असून याबाबत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार दोन्ही तालुका समितीच्या अध्यक्ष आणि सदस्यांना नियुक्ती पत्र दिले आहे. रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी सतीष रावसाहेब आंबेकर रा. नरवटवाडी यांची तर सदस्यपदी ललीता अरुण कांबळे रा. पानगाव, कस्तुराबाई आत्माराम माने रा. चाडगाव, विठ्ठल काशीनाथ कसपटे रा. निवाडा, संजय लक्ष्मण चव्हाण रा. हरिओम नगर, रेणापूर, गोविंदराव नानासाहेब देशमुख रा. डि. देशमुख, सदानंद केदारनाथ पिंपळे रा. खरोळा, विरेंद्रसिंह गोविंदसिंह चौहान रा. पानगाव, सतिश उध्दराव जाधव रा. बिटरगाव, सुरेश रामराव बुड्डे रा. आनंदवाडी यांचा





समावेश करण्यात आला आहे. लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी बन्सी भगवानराव भिसे रा. सारसा यांची तर सदस्यपदी परमेश्वर माधवराव पर्वते रा. शिवणी, स्वाती किशोर घुटे रा. एकुरगा, संतोष नारायण गायकवाड रा. सलगरा बु., अंकुश हरिभाऊ कुंभार रा. मुरुड, विनायक मल्हारी मगर रा. रामेगाव, सदाम रशीद शेख रा. मुरुड, सदाशिव सोपान गव्हाने रा. सलगरा, रुपेश सुर्यकांत काळे रा. भातखेडा, बाबासाहेब साहेबराव भिसे रा. गाधवड समितीत यांचा समावेश करण्यात आला आहे. रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या नवनिर्वाचित अध्यक्ष आणि सदस्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के

कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त रोटरीयन सदस्य व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून रोटरी क्लब धाराशिव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत रक्त तपासणी शिबिरास रोटरियन, Anns व त्यांच्या परिवारातील सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रामनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, न. प. शाळा क्रमांक २४ येथे पार पडलेल्या या शिबिरामध्ये तब्बल १२५ जणांनी सहभाग नोंदवून विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या. विशेष बाब प्राथमिक आरोग्य केंद्राकडे तपासणीसाठी व टेस्टसाठी लोकांचा वाढता कल

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व लक्षात घेऊन रोटरी क्लब धाराशिवतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबिरामध्ये CBC Count, LFT (Liver Function Test), KFT (Kidney Function Test), Lipid Profile, Thyroid Test, Electrolyte Test, Hb-1c VgoM Sugar Fasting / PP अशा विविध रक्त तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात आल्या. सकाळपासूनच सहभागींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दिसून आली.

या शिबिरास रोटरी क्लब धाराशिवचे अध्यक्ष रंजीत रनदीवे, सचिव प्रदीप खामकर तसेच रोटरी सेवा ट्रस्टचे सचिव प्रवीण काळे, सदस्य सुनील गर्जे, चित्रसेन राजेनिंबाळकर, पी. के. मुंडे यांनी उपस्थित राहून शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. तसेच रोटरी सदस्य संजय चव्हाण, चंदन भडंगे, अमोल माने, गिरीश आस्टगी, अभिजित पवार, अभिजित पाटील, सूरज कदम तसेच शासकीय अधिकारी १) डॉ. स्वप्नील आकोसकर वैद्यकीय अधिकारी

२)डॉ.अनुराधा लोखंडे वैद्यकीय अधिकारी

३) श्री.चेतन दुबे औषध निर्माता

४) श्रीमती.माया राठोड स्टाफ नर्स

५) श्रीमती. तहसीन शेख स्टाफ नर्स

६) श्रीमती अर्चना शिंदे प्रयोगशाळा तंत्रज्ञ ( HLL)

७) श्री .स्वराज सूर्यवंशी प्रयोगशाळा तंत्रज्ञ (HLL) यांनी देखील शिबिराच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

शिबिरामध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी रोटरी क्लब धाराशिवच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी व समाजामध्ये नियमित आरोग्य तपासणीची सवय वाढीस लागावी, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

रोटरी क्लब धाराशिवच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण झाला असून, नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्राकडे वाढता कल दिसत आहे अशा उपक्रमांमध्ये पुढील काळातही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

## अज्ञाताने केली मोटरसायकलची चोरी गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी - शिवाजी उलन पवार, वय २४ वर्षे, रा. अंबी रोड पाथरुड ता. भुम जि. धाराशिव यांची अंदाजे १५,०००किंमतीची मोटरसायकल ही दि.११.०५.२०२६ रोजी फिर्यादीचे घरासमोर अंबी रोड पाथरुड येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शिवाजी पवार यांनी दि.१२.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# सीना-कोळेगाव प्रकल्पात बाष्पीभवनामुळे जलसाठ्यात घट

परंडा (प्रतिनिधी)- परंडा तालुक्यातील सीना-कोळेगाव प्रकल्पासह खासापुरी, चांदणी, साकत मध्यम प्रकल्प आणि निम्नखैरी बृहतलघु प्रकल्प गतवर्षी १०० टक्के भरल्याने तालुक्यातील सिंचन क्षेत्रात मोठी वाढ झाली. मात्र शेतीसाठी वाढलेला पाण्याचा उपसा आणि उन्हाळ्यातील तीव्र बाष्पीभवनामुळे प्रकल्पांतील पाणीसाठा झपाट्याने घटत असून सध्या सीना-कोळेगाव प्रकल्पात ५२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

दुष्काळी भाग म्हणून ओळख असलेल्या परंडा तालुक्यात मध्यम प्रकल्पांची संख्या अधिक आहे. सन २००७ मध्ये जिल्ह्यातील सर्वात मोठा ५.३० टीएमसी क्षमतेचा सीना-कोळेगाव प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पामुळे परंडा तालुक्यातील ८७०० हेक्टर आणि करमाळा तालुक्यातील ३४०० हेक्टर असे एकूण १२ हजार २०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र कालव्यांची कामे अद्याप पूर्ण होणे आवश्यक असल्याचे चित्र आहे.

सीना-कोळेगाव प्रकल्प २०११, २०१६-१७, २०१८-१९, २०२०-२१, २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ अशा सात वेळा पूर्ण क्षमतेने भरला आहे. सध्या प्रकल्पात १५० दलघमींपैकी ७८ दलघमी म्हणजेच ५२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. यामध्ये ६१ दलघमी मृतसाठा असून १७ दलघमी जिवंत पाणीसाठा आहे. गतवर्षी खासापुरी, साकत, चांदणी मध्यम प्रकल्प तसेच निम्नखैरी बृहतलघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्याने परिसरातील विहिरी आणि बोअरची पाणीपातळी वाढली. त्यामुळे सिंचनाखालील क्षेत्रात वाढ होऊन शेतकऱ्यांनी ऊस लागवडीकडे मोठ्या प्रमाणात कल वाढवला. मागील वर्षी तब्बल १७ हजार हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड करण्यात आली होती. पूर्वी तालुक्यात साखर कारखाना नसल्याने शेतकऱ्यांची मोठी फरपट होत होती. मात्र माजी पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी सन २००८ मध्ये भैरवनाथ शुगर युनिट उभारल्याने तालुक्यावरील 'गेटकेन'चा शिक्का पुसला गेला.

ऊस लागवडीमुळे खरीप-रब्बी क्षेत्रात घट तालुक्यात सरासरी ६१५ मिमी पावसाची आवश्यकता असते. सलग तिसऱ्या वर्षी सीना-कोळेगाव प्रकल्प १०० टक्के भरल्याने परिसरातील सिंचन क्षेत्र वाढले आणि ऊस लागवडीला मोठी चालना मिळाली. परिणामी खरीप व रब्बी क्षेत्रात घट झाल्याचे दिसून येत आहे. एकेकाळी रब्बी ज्वारीचे कोठार म्हणून ओळख असलेल्या परंडा तालुक्यात आता नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. गतवर्षी वेळेवर झालेल्या पावसामुळे ज्वारीचे पीक चांगले आले. उडीद, तुर, कांदा आणि कापूस या पिकांमुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक मदत झाली. मात्र यंदा कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने बाजारभाव घसरले आणि अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही निघाला नाही. त्यामुळे पिकांचे नियोजन आणि बाजारभावाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



प्रकल्पांतील जलसाठ्यात मोठी घट तालुक्यातील सर्वात मोठ्या सीना-कोळेगाव प्रकल्पात सध्या ५२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तर चांदणी मध्यम प्रकल्पात १३.८५ टक्के, खासापुरी मध्यम प्रकल्पात १५.३३ टक्के, पांढरेवाडी बृहतलघु प्रकल्पात ९ टक्के आणि साकत मध्यम प्रकल्पात ७.१२ टक्के जलसाठा शिल्लक आहे. खंडेश्वरवाडी मध्यम प्रकल्पातील पाणी जोत्याखाली गेले आहे. परंडा तालुक्यात भिमा नदीची उपनदी असलेली सीना ही सर्वात मोठी नदी असून यावर अनेक प्रकल्प व बंधारे उभारण्यात आले आहेत. सीना-कोळेगाव धरणाचे पाणलोट क्षेत्र ५५६९ चौ. किमी आहे. धरणाची एकूण साठवण क्षमता १५०.४९ दलघमी म्हणजे सुमारे साडेपाच टीएमसी आहे. त्यापैकी १०४.३५ दलघमी पाणी वापरण्यायोग्य असून उपयुक्त पाणीसाठा ७६.१८ दलघमी आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी जलसाठा आरक्षित परंडा नगरपरिषदेने शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी १५ जुलै २०२६ पर्यंत १.२६ दलघमी पाणी आरक्षित केले आहे. तसेच खासापुरी प्रकल्पातून शहरासाठी २.२६ दलघमी पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने यंदा पाणी वापराबाबत अधिक सतर्कता बाळगावी लागणार आहे. शेतीसाठी वाढता पाण्याचा उपसा, ऊस लागवडीचे विस्तारित क्षेत्र आणि बाष्पीभवनामुळे जलसाठ्यावर ताण निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. आगामी पावसाळा लांबल्यास ग्रामीण भागात टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## डॉ. शरद (बाप्पा) जाधवर सरांवर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव



धाराशिव (शेख अंजुम)-जिल्ह्यातील कळंब येथील रेणुका फौउंडेशन ग्रुप ऑफ इंन्टटयुट चे संस्थापक व शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभअध्यक्ष डॉ. शरद (बप्पा) जाधवर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव केला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व स्तरातून त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पुढील सामाजिक व शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात येत आहेत.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**
**9284321472**


# विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्रीवर कारवाईचा इशारा: व्यापारी,संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी नियमांचे पालन करावे; पणन विभागाचे परिपत्रक जारी

धाराशिव दि.१४ मे (जिमाका) राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये नियमांचे पालन व्हावे आणि शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा कृषी उत्पन्न पणन विभागाने दिला आहे. यासंदर्भात परिपत्रक जारी करण्यात आले असून,व्यापारी,संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांनी कायद्यातील तरतुदींचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यात महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ लागू असून, या कायद्यानुसार राज्यातील शेतमाल खरेदी-विक्रीचे विनियमन करण्यात येते.मात्र,सध्या राज्यातील विविध भागांमध्ये अनेक व्यापारी,काही संस्था तसेच शेतकरी संस्था मोठ्या प्रमाणात कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी-विक्री करत असल्याच्या तक्रारी संबंधित कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांना वेळोवेळी अशा प्रकारचे व्यवहार करणे अनुचित असल्याचे कळविण्यात आले होते. तरीही अनेक व्यापारी व संस्था विनापरवानगी शेतमाल खरेदी-विक्री करत असल्याचे निदर्शनास आल्याने प्रशासनाने याबाबत गंभीर दखल घेतली आहे.

महाराष्ट्र शासनाने ५ जुलै २०१६ रोजी अध्यादेश क्रमांक १५ राजपत्रात प्रसिद्ध केला होता.या अध्यादेशाच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचना ८ जुलै २०१६ रोजी निर्गमित करण्यात आल्या होत्या.त्यानंतर दि. ३१ डिसेंबर २०१८ रोजीच्या शासन राजपत्रान्वये मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मधील पोटकलम २ मध्ये आणखी सुधारणा करण्यात आली आहे.

सुधारित तरतुदीनुसार,मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मधील पोटकलम २ (अ) अंतर्गत कलम ५ ड मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांशिवाय कोणत्याही लायसन किंवा परवानगीची आवश्यकता भासणार नाही आणि अशा पणनाचे बाजार समितीकडून विनियमन केले जाणार नाही.मात्र,कलम ५ ड नुसार लायसन आवश्यक असल्यास संबंधितांनी बाजार समितीकडून परवाना घेणे बंधनकारक राहणार आहे. तथापि,अशा लायसनधारकांकडून बाजार शुल्क आकारले जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.कायद्यातील कलम ५ (ड) नुसार थेट पणन, खाजगी बाजार,शेतकरी - ग्राहक बाजार तसेच ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म यासाठी लायसन देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्यामुळे यापुढे कोणत्याही व्यापाऱ्यांनी,संस्थांनी,शेतकरी उत्पादक कंपन्यांनी अथवा शेतमाल व्यापाराशी संबंधित इतर घटकांनी कायद्यातील तरतुदींनुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करू नये. अन्यथा संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा स्पष्ट इशारा परिपत्रकातून देण्यात आला आहे.

# 'एल-निनो'च्या संकटावर मात करण्यासाठी मूलस्थानी जलसंधारणाचा अवलंब करा

## पावसाचा प्रत्येक थेंब शेतात जिरवा-जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

धाराशिव (जिमाका)- चालू वर्षात 'एल-निनो' (El-Nino) प्रभावामुळे महाराष्ट्रातील शेतीसमोर गंभीर आव्हाने उभी राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पावसाचे उशिरा आगमन,पावसातील प्रदीर्घ खंड तसेच एकूण पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांनी आतापासूनच उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. या संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणि पिकांना पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता मिळावी यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांनी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना 'मूलस्थानी जलसंधारण' (In-situ Soil Moisture Conservation) तंत्राचा मोठ्या प्रमाणावर अवलंब करण्याचे आवाहन केले आहे.

शेतात पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरवून ओलावा टिकवून ठेवणे,ही काळाची गरज असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.त्यासाठी मशागत आणि पेरणीच्या पद्धतीत बदल करण्यावर भर देण्यात आला आहे.शेताची नांगरणी व मशागत उताराला आडवी करावी,जेणेकरून पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरेल.तसेच पेरणी समपातळीवर केल्यास जमिनीची धूप थांबून पाण्याचा प्रत्येक थेंब पिकांच्या मुळांपर्यंत पोहोचण्यास मदत होते.

रुंद सरी-वरंबा (BBF) पद्धतीचा वापर करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.या तंत्रामुळे पावसाच्या खंडात जमिनीत ओलावा टिकून राहतो,तर अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाण्याचा सुरक्षित निचरा होतो.यासोबतच जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी धूप प्रतिबंधक पिके घेणे आणि खोल नांगरट करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

उभ्या पिकांमध्ये आंतरमशागत,सरी काढणे आणि 'मृत सरी' (Dead Furrow) तयार करणे या उपाययोजना पिकांना जीवदान देणाऱ्या ठरू शकतात.पावसाचा मोठा खंड पडल्यास या सऱ्यांमुळे जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होते.तसेच जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन रोखण्यासाठी सेंद्रिय अवशेषांचे आच्छादन (Mulching) करण्याचा सल्लाही कृषी विभागाने दिला आहे. संरक्षित सिंचनासाठी शेततळे खोदून त्यास प्लास्टिक अस्तरीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे अतिरिक्त पावसाचे पाणी साठवून त्याचा वापर पिकांसाठी करता येऊ शकतो.तसेच शेतात ढाळीचे बांध,कंपार्टमेंट बंडींग,लूज बोल्डर,गॅबियन आणि सिमेंट नाला बांध यांसारख्या क्षेत्र व नाला उपचारांची कामे प्राधान्याने करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या सर्व उपाययोजनांसाठी शासनाच्या जलयुक्त शिवार अभियान २.०,नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (POCRA) तसेच मनरेगा योजनेंतर्गत निधीची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. 'एल-निनो'मुळे निर्माण होऊ शकणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी जलसंधारण तंत्रांचा प्रत्यक्ष शेतात अवलंब करावा.पावसाच्या अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी हीच सर्वात प्रभावी उपाययोजना ठरणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649